। धाराशिव । वर्ष २५ वे । अंक २२६ वा । गुरूवार दिनांक २० नोव्हेंबर, २०२५ । पृष्ठे ६ । किंमत ०१ ₹

RNI MAHMAR/2003/11649

# लातूर समाचार

(सांज दैनिक)
प्रकाशन: धाराशिव (उस्मानाबाद आवृत्ती)
पोष्ट परवाना L2/RNP/OMD- 52/24-26

dainiklatursamachar@gmail.com
संस्थापक : स्व. शंकर माधव जडे (स्वातंत्र्य सैनिक)

## क्राईम न्युज

### अवैध गुटखा विक्रीसाठी जवळ बाळगणाऱ्यावर गुन्हा

शिराढोण (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत वहाब रा. इस्लामपुरा कळंब ता. कळंब जि. धाराशिव यांनी दि.१८.११.२०२५ रोजी .शिराढोण ते कोल्हेगाव रोडवर हासेगाव पाटीजवळ महाराष्ट्रात शासनाचे प्रतिबंधीत केलेला गुटखा व तत्सव पदार्थ विमल पान मसाला, राजनिवास पानमसाला, डायरेक्टर पान मसाला, गोवा, जाफरानी जर्दा, शॉट पत्ती, तम्बांखु मोटरसायकल सह असा एकुण ४८,१४४ किंमतीचे विक्री करीता जवळ बाळगुन विक्री करत असताना शिराढोण पोलीसांना मिळून आला. यावरुन पोलीसांनी गुटखा साहित्यासह जप्त करुन नमूद व्यक्तींविरुध्द भा.न्या.सं. कलम- १२३, २२३, २७४, २७५, सह अन्न सुरक्षा मानके अधिनियम कलम ५९ अन्वये शिराढोण पो ठाणे येथे गुन्हा नोंदवला आहे.

### गोवंशीय जनावरांचे मांस वाहतुक करणाऱ्यावर गुन्हा दाखल

परंडा (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत पोलीसाकडून समजलेली माहिती अशी की, सलमान रा. जुनी तहसील जवळ परंडा ता. परंडा जि. धाराशिव, अफजल मंजुर कुरेशी, रा. दर्गा रोड परंडा ता. परंडा जि. धाराशिव यांनी दि.१८.११.२०२५ रोजी परंडा ते बार्शी जाणारे रोडवर ब्रम्हगाव शिवारात बोलेरो गाडी क्र एमएच २० बी.वाय ९१७७ मध्ये गोवंशीय जनावरांचे ७९५ किलो मांस एकुण१,५९,००० किंमतीचे विक्री करण्यासाठी बेकायदेशीर रित्या वाहतुक करत असताना परंडा पोलीसांना मिळून आले. यावरुन पोलीसांनी सरकारतर्फे नमूद व्यक्तींविरुध्द भा.न्या. सं. कलम ३२५ सह कलम ५(क), ९, ९(अ) महाराष्ट्र प्राणी संरक्षण अधिनियम अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

### बिअरबॉक्सची चोरी

कळंब (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत फिर्यादी रंजित रोहीदास हौसलमल, वय ४१ वर्षे, रा. कल्पना नगर कहंब ता. कळंब जि. धाराशिव यांचे छत्रपती शिवाजी महाराज चौक ते भाजी मंडई जाणारे रोडवर हौसलमल बियर शॉपी दुकानाचे गोडाउनवरील रुमचा पत्रा उचकटुन आतमध्ये प्रवेश करुन एकुण ७८ बियरचे बॉक्स एकुण १,८२,५२० किंमतीचा माल आज्ञत व्यक्तीने दि.१२.११.२०२५ रोजी २२.३० ते दि.१३.११.२०२५ रोजी १०.३० वा. सु. चोरुन नेला. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे-रंजित हौसलमल यांनी दि.१८.११.२०२५रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन कळंब पो ठाणे येथे भा.न्या. सं.कलम ३३१(४),३०५ अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

### 'तडजोड शुल्क'वसुल

धाराशिव (प्रतिनिधी)- शहर वाहतुक शाखा व संबंधीत पोलीस ठाण्यांनी महत्त्वाच्या रस्त्यांवर दि.१८ नोव्हेंबर रोजी मोटार वाहन कायदा-नियम भंग प्रकरणी एकुण २१६ कारवाया करुन १,६९,३०० 'तडजोड शुल्क'वसुल केले आहे.

## बालविवाहमुक्त धाराशिवचा संकल्प

### चाइल्ड हेल्पलाईन १०९८ च्या जनजागृती उपक्रमांना विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद



धाराशिव (जिमाका) -जिल्ह्यात बालविवाहमुक्त अभियानाच्या १०० दिवसांच्या कार्यक्रमाअंतर्गत चाइल्ड हेल्पलाईन १०९८ तर्फे विविध शाळांमध्ये जनजागृती उपक्रम राबविण्यात येत असून विद्यार्थ्यांमध्ये बालहक्कांविषयी जागरूकतेची नवी चेतना निर्माण होत आहे. प्रत्येक ठिकाणी विद्यार्थी,शिक्षक आणि स्थानिक प्रशासनाचा भरभरून प्रतिसाद मिळत असून मुलांच्या सुरक्षिततेसाठी समाज एकदिलाने पुढे येताना दिसत आहे.

नुकतेच ज्ञानोद्योग कनिष्ठ महाविद्यालय,येरमाळा येथे प्रभारी जिल्हा महिला अधिकारी श्री.किशोर गोरे,जिल्हा बाल संरक्षण अधिकारी श्री.ए.बी.कोवे व चाइल्ड हेल्पलाईन १०९८ चे प्रकल्प समन्वयक श्री.व्ही.पी.चव्हाण यांच्या मार्गदर्शनात जनजागृती कार्यक्रम घेण्यात आला.

विद्यार्थ्यांशी संवाद साधताना बालहक्क,बालसमस्या,बालविवाहाचे धोके,तसेच बालकांसाठी उपलब्ध विविध शासकीय योजनांची माहिती देण्यात आली. चाइल्ड हेल्पलाईन कक्षाच्या सूपरवायजर श्रीमती पल्लवी पाटील यांनी १०९८ हेल्पलाईनची गरज,कार्यपद्धती आणि आपत्कालीन परिस्थितीत कशी मदत मिळते याबद्दल मार्गदर्शन केले.कार्यक्रमास महाविद्यालयाचे मुख्याध्यापक,शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

जि.प.प्रा.शाळा खताळवाडी, गडदेवदरी,तसेच सैनिकी विद्यालय तुळजापूर व जवाहर नवोदय विद्यालय तुळजापूर येथेही मुलांशी संवाद साधण्यात आला.यावेळी मुलांच्या समस्या जाणून घेऊन बालविवाह प्रतिबंध,तसेच मुलांच्या सुरक्षेसाठी उपलब्ध यंत्रणांची माहिती देण्यात आली.

चाइल्ड हेल्पलाईन कक्षातील समुपदेशक वंदना कांबळे, सूपरवायजर अशोक चव्हाण,केस वर्कर अभय काळे यांनी १०९८ विषयी माहिती देत विद्यार्थ्यांना भीती न बाळगता आवाज उठा,१०९८ ला कॉल करा असा संदेश दिला.

तसेच मौलाना आझाद उर्दू शाळा, धाराशिव व विद्यानिकेतन माध्यमिक विद्यालय,येरमाळा येथे जनजागृती कार्यक्रम घेण्यात आला.जिल्हा बाल संरक्षण अधिकारी श्री.अमोल कोवे, जयश्री पाटील,प्रकल्प समन्वयक श्री.विकास चव्हाण,तसेच सखी वन स्टॉप सेंटरच्या केंद्र प्रशासक प्रियांका जाधव यांनी मुलांच्या हक्कांविषयी मार्गदर्शन केले. चाइल्ड हेल्पलाईन १०९८ विषयी सविस्तर माहिती श्रीमती पल्लवी पाटील,केस वर्कर अभय काळे यांनी दिली.

या सर्व उपक्रमांतून मुलांना तुम्ही एकटे नाही,१०९८ तुमच्यासोबत आहे हा आश्वासक संदेश देण्यात आला. शाळांमध्ये मिळालेला उत्स्फूर्त प्रतिसाद पाहता धाराशिव जिल्हा बालविवाह व बालशोषणाविरुद्ध सजगपणे लढा देत असल्याचे स्पष्ट होते.

## जिल्ह्यात 1 डिसेंबरपर्यंत मनाई आदेश

धाराशिव ( जिमाका ): स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर तसेच जिल्ह्यातील शेतकरी आंदोलनांची शक्यता लक्षात घेता,कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी जिल्ह्यात १८ नोव्हेंबर २०२५ रोजी रात्री १ वाजेपासून ते १ डिसेंबर २०२५ रोजी रात्री १२ वाजेपर्यंत (दोन्ही दिवस धरून) महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ३७(१)(३) अन्वये जमावबंदी व शस्त्रबंदीचे मनाई आदेश लागू करण्यात आला आहे.हा आदेश अपर जिल्हादंडाधिकारी श्री.विद्याचरण कडवकर यांनी जारी केला आहे.

पोलीस अधीक्षक,धाराशिव यांनी दिलेल्या अहवालानुसार स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीदरम्यान विविध पक्ष,संघटना,गट यांच्या सभा, कार्यक्रम आणि प्रचारामुळे मोठ्या प्रमाणात गर्दी होण्याची शक्यता आहे.यामुळे पक्षांतर,गटबाजी, आरोप-प्रत्यारोप यामुळे वाद निर्माण होऊन शांतता भंग होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

तसेच जिल्ह्यात अतिवृष्टीमुळे पिकांचे,घरांचे आणि जनावरांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. पिकविमा,नुकसान भरपाई आणि ओला दुष्काळ जाहीर करण्याच्या मागणीसाठी शेतकरी,संघटना किंवा इतर व्यक्तींमार्फत अचानक मोर्चे, धरणे, उपोषणे, रास्तारोको, आत्मदहन यांसारख्या आंदोलनात्मक कार्यक्रमांचे आयोजन होण्याची शक्यता आहे.

शस्त्र, काठी, तलवार, बंदूक, लाठ्या किंवा शारीरिक इजा करणाऱ्या वस्तू जवळ बाळगणे,कोणतेही दाहक पदार्थ किंवा स्फोटक पदार्थ बाळगणे, दगडफेकासाठी साधने साठवणे किंवा तयार करणे,उत्तेजक भाषणे, विडंबन, असभ्य कृती,समाजात तणाव निर्माण करणारे फलक/चित्रे जवळ बाळगणे,संविधानिक मूल्यांना बाधा आणणारी घोषणे,गाणी,वाद्य वाजवणे,मानवी किंवा अन्य आकृती/प्रतिमा प्रदर्शन,पाच किंवा अधिक व्यक्तींच्या जमावास परवानगीशिवाय एकत्र येणे,मिरवणुका किंवा मोर्चे काढणे या बाबींना प्रतिबंधात्मक आदेशानुसार मनाई केली आहे.

अंत्ययात्रा, धार्मिक विधी, लग्न समारंभ, सामाजिक सण, शासकीय कार्यक्रम, शासकीय कार्यरत कर्मचारी, सार्वजनिक करमणुकीची ठिकाणे (सिनेमागृहे,रंगमंच इ.) यांना या आदेशातून सूट देण्यात आली आहे.

सभा,मोर्चा किंवा निवडणूक प्रचार सभा आयोजित करावयाची असल्यास, संबंधित व्यक्तींनी पोलीस अधीक्षक धाराशिव किंवा उपविभागीय पोलीस अधिकारी (धाराशिव/तुळजापूर/उमरगा/कळंब/भूम) यांच्याकडून लेखी परवानगी घेणे बंधनकारक आहे. परवानगी मिळाल्यानंतरच संबंधित कार्यक्रमांसाठी जमावबंदी लागू राहणार नाही. अपर जिल्हादंडाधिकारी विद्याचरण कडवकर यांनी नागरिकांना प्रशासनाला सहकार्य करण्याचे आवाहन केले आहे.

## ज्येष्ठ नागरिकांच्या हक्कांबाबत जागरूकता जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचा पुढाकार

धाराशिव दि.१८ नोव्हेंबर (जिमाका) पालक आणि ज्येष्ठ नागरिकांच्या देखभाल आणि कल्याणाविषयी जागरूकता कार्यक्रम जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाच्या पुढाकाराने १७ नोव्हेंबर रोजी उत्साहात पार पडला.

महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण, मुंबई यांच्या निर्देशानुसार पालक आणि ज्येष्ठ नागरिकांच्या देखभाल आणि कल्याण कायदा,२००७ मधील प्रमुख तरतुदी तसेच कायद्याबद्दल माहिती सर्वसामान्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी जिल्हा विधी सेवा प्राधिकरण,धाराशिव येथील कॉन्फरन्स हॉलमध्ये कार्यक्रम आयोजित करण्यात आला.

जिल्हा विधी सेवा प्राधिकरण अध्यक्षा तथा प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश श्रीमती अभिश्री देव यांनी मार्गदर्शन केले.कार्यक्रमाच्या अध्यक्षा व उदघाटक श्रीमती भाग्यश्री पाटील, सचिव,जिल्हा विधी सेवा प्राधिकरण ह्या होत्या.

यावेळी पालक आणि ज्येष्ठ नागरिकांना कायदेशीर सल्ला व मार्गदर्शनासाठी जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाशी संपर्क साधावा,असे आवाहन न्या.श्रीमती पाटील यांनी केले.

प्राधिकरणाच्या मोफत टोल फ्री क्रमांक १५१०० बाबत माहिती देत त्यांनी राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरणाच्या विविध योजना व उपक्रमांची माहितीही उपस्थितांना दिली.ज्येष्ठ नागरिकांच्या सहाय्यासाठी सदैव तत्पर असणाऱ्या धाराशिव ज्येष्ठ नागरिक संघटनेचे विशेष कौतुक करण्यात आले.

कार्यक्रमास ॲड.अमोल वरूडकर (अध्यक्ष,विधीज्ञ मंडळ),ॲड. अमोल गुंड (मुख्य न्यायरक्षक), ॲड. विनायकराव बाबासाहेब देशमुख (अध्यक्ष,धाराशिव ज्येष्ठ नागरिक संघटना),श्री.रमेश वट्टे,श्री. दिलीप पाटील,श्री.राजेंद्र अत्रे (साहित्यीक/माजी शिक्षक) यांची उपस्थिती होती.

कार्यक्रमात ॲड.गोरख कस्पटे, उपमुख्य न्यायरक्षक यांनी पालक आणि ज्येष्ठ नागरिकांच्या देखभाल आणि कल्याण कायद्यावरील मार्गदर्शनपर विचार मांडले.श्री.राजेंद्र अत्रे यांनी ज्येष्ठ नागरिकांचे अधिकार याविषयी भाष्य केले.श्री.अनिल पाटील,ऑडिटर यांनी ज्येष्ठ नागरिकांच्या समस्या मांडल्या. ज्येष्ठ नागरिकांच्या समस्या जाणून त्यांचे निराकरण करण्याचे आश्वासन सचिव श्रीमती भाग्यश्री पाटील यांनी व्यक्त केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ॲड. श्रीमती मोहिनी शिरूरे,तर प्रास्ताविक व आभारप्रदर्शन ॲड.श्रीमती विमल म्हेत्रे यांनी केले.कार्यक्रम यशस्वीतेसाठी जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे कर्मचारी आणि धाराशिव ज्येष्ठ नागरिक संघटना यांचे पदाधिकारी यांनी परिश्रम घेतले.

## भारतीय टपाल विभागाची परदेश पार्सल सेवा आता अधिक सुलभ व किफायतशीर

धाराशिव (जिमाका)- भारतीय डाक विभागाने नागरिकांसाठी परदेशात पार्सल पाठविण्याची सेवा अधिक सुलभ दरात उपलब्ध करून दिली असून, सणासुदीच्या काळात तसेच वैयक्तिक-व्यावसायिक गरजांसाठी ही सेवा अत्यंत उपयुक्त ठरणार आहे. धाराशिव विभागाच्या लातूर येथील अधीक्षक डाकघर कार्यालयाकडून याबाबत माहिती देण्यात आली आहे.

या सेवेअंतर्गत फराळ,भेटवस्तू, दस्तऐवज तसेच इतर महत्वाचे साहित्य सुरक्षित आणि विश्वसनीय पद्धतीने परदेशात निश्चित स्थळी पाठविता येणार आहे.मोठ्या आकाराच्या पार्सल्ससाठीही ही सुविधा उपलब्ध आहे.

सेवेची प्रमुख वैशिष्ट्ये म्हणजे सर्वसामान्यांना परवडणारे,सुलभ दर. पार्सलची पूर्ण सुरक्षित हाताळणी.

नियोजित वेळेत वितरण.जवळच्या टपाल कार्यालयातून सोपी प्रक्रिया. पार्सल ट्रॅकिंगची ऑनलाइन सुविधा आहे.

नागरिकांनी जवळच्या टपाल कार्यालयात पार्सल जमा करावे.

वजन व गंतव्यस्थानानुसार दर निश्चित केले जातील.ग्राहकाला पावती व ट्रॅकिंग आयडी दिला जाईल. पार्सल सुरक्षितपणे परदेशात पोहोचवले जाईल.

सणासुदीच्या काळात भेटवस्तू पाठविणे सोपे आहे.व्यावसायिक व औपचारिक दस्तऐवज पाठविण्यास विश्वासार्ह सुविधा. ऑनलाइन ट्रॅकिंगद्वारे पार्सलची स्थिती सतत तपासण्याची सोय आहे.

नागरिकांनी अधिक माहितीसाठी जवळच्या मुख्य/उप टपाल कार्यालयाशी संपर्क साधावा किंवा ॣ.ळपवळर्ींिी.र्सीं.ळप या संकेतस्थळाला भेट द्यावी.तसेच संपर्कासाठी श्री.मोहन सोनटक्के यांच्याशी ९८३४९५८३१७ या भ्रमणध्वनी क्रमांकावर संपर्क साधता येईल.

भारतीय टपाल विभागाने दिलेली ही सेवा परदेशात साहित्य पाठविण्याचा त्रास कमी करत असून, नागरिकांसाठी एक विश्वासार्ह, सुरक्षित आणि किफायतशीर पर्याय उपलब्ध करून देत आहे.

## १३ डिसेंबरला जिल्ह्यात राष्ट्रीय लोकअदालती विविध तडजोडपात्र प्रकरणांच्या जलद निपटाऱ्याची संधी

धाराशिव, (जिमाका)- राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरण,सर्वोच्च न्यायालय, नवी दिल्ली यांच्या निर्देशानुसार जिल्ह्यातील सर्व न्यायालयांमध्ये शनिवार, १३ डिसेंबर २०२५ रोजी राष्ट्रीय लोकअदालतीचे आयोजन करण्यात येणार आहे.

या लोकअदालतीत मोटार वाहन अपघात प्रकरणे,कौटुंबिक प्रकरणे,वीज वितरण कंपनीशी संबंधित प्रकरणे,दिवाणी तसेच तडजोडपात्र फौजदारी प्रकरणे तसेच बँका आणि वीज वितरण कंपन्यांची दाखलपूर्व प्रकरणे यांचा समावेश करण्यात येणार आहे.याशिवाय कौटुंबिक न्यायालय आणि ग्राहक तक्रार निवारण मंचातील प्रकरणे देखील तडजोडीसाठी या लोकअदालतीत ठेवण्यात येणार आहेत.

लोकअदालतीमध्ये प्रकरण तडजोडीने मिटविल्यास संबंधित पक्षकाराला भरलेली न्यायालयीन फी परत मिळते,ही महत्वाची सुविधा उपलब्ध आहे.नागरिकांनी आपापसातील वाद समोपचाराने मिटवून वेळ,पैसा आणि मानसिक ताण-तणावाची बचत करावी,असे आवाहन करण्यात आले आहे.

राष्ट्रीय लोकअदालतीचा अधिकाधिक नागरिकांनी लाभ घ्यावा,असे आवाहन जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाच्या अध्यक्षा न्या. श्रीमती अभिश्री देव आणि सचिव न्या. श्रीमती भाग्यश्री पाटील यांनी केले आहे.

आपली प्रकरणे लोकअदालतीत ठेवण्यास इच्छुक नागरिकांनी जिल्हा न्यायालयातील जिल्हा विधी सेवा प्राधिकरण,धाराशिव किंवा संबंधित तालुका विधी सेवा समिती येथे संपर्क साधावा.अधिक माहितीसाठी ८५९१९०३६२५ या दूरध्वनी क्रमांकावर किंवा वश्रीरीव२५सारळश्र.लो या ई -मेलवर संपर्क साधावा.तसेच प्रकरणे लोकअदालतीत ठेवण्यासाठी पक्षकारांनी आपल्या वकीलांशीही संपर्क साधावा, असेही कळविण्यात आले आहे.

## मुख्य रस्त्यावरील पाइपलाइन फुटून पडलेल्या खड्ड्यामुळे अपघाताचा धोका



लोहारा (प्रतिनिधी)-लोहारा ते आष्टामोड या मुख्य रस्त्यावर पाणीपुरवठा पाइपलाइन फुटून पडलेल्या मोठ्या खड्ड्यांमुळे अपघात होत आहेत. पुढील सात दिवसांच्या आत याठिकाणी दुरुस्ती करण्यात यावी, अशी मागणी माजी नगरसेवक श्यामसुंदर नारायणकर यांनी मुख्याधिकारी यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

माजी नगरसेवक शामसुंदर नारायणकर यांनी मंगळवारी (दि. १८) लोहारा नगरपंचायतचे मुख्याधिकारी यांना निवेदन दिले आहे. यात म्हणले की, लोहारा शहरातील लोहारा-आष्टामोड रस्त्यावरील हॉटेल शिवनेरीसमोर पाणीपुरवठा पाइपलाइन फुटल्यामुळे मोठा खड्डा पडला आहे. मोटारसायकल, चारचाकी वाहन खड्ड्यात आदळून लोकांना मार लागत लोक जखमी होत आहेत.

दि. १७ नोव्हेंबर रोजी मोटारसायकल खड्ड्यात पडून एक महिला गंभीर जखमी झाली आहे. तिच्यावर सध्या ग्रामीण रुग्णालय लोहारा येथे उपचार सुरू आहेत. सात दिवसाच्या आत सदर खड्डा पाइपलाइन लिकेज दुरुस्त करून बुजवण्यात यावा, अन्यथा मी त्याच खड्ड्यात बसून दि. २७ नोव्हेंबर रोजी ठिय्या आंदोलन करणार आहे, असा इशारा निवेदनाद्वारे दिला.

## म्हशीला धडक लागून एक मयत तर दुसरा गंभीर जखमी

धाराशिव (प्रतिनिधी)- शहर पोलीस ठाणे अंतर्गत संतोष मोतीराम सुरवसे, व सोबत मयत दत्तु नामदेव दिंडोळे, वय ८१ वर्षे, रा. चिलवडी ता. जि. धाराशिव हे दोघे दि.२१.०८.२०२५ रोजी १२.१५ वा. सु. मोटरसायकलवरुन जात होते. दरम्यान राघुचीवाडीच्या पुढे इंडियन विटभट्टी जवळ धाराशिव येथे संतोष यांनी त्याचे ताब्यातील मोटरसायकल ही चालवून अचानक म्हैस आडवी आल्याने म्हशीला धडक लागून मयत नामे दत्तु दिंडोळे हे गंभीर जखमी होवून मयत झाले. अनिल दत्तु दिंडोळे, वय ४६ वर्षे, रा.चिलवडी ता. जि. धाराशिव यांनी दि.१७.११.२०२५ रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन धाराशिव शहर पो ठाणे येथे भा.न्या.सं. कलम २८१, १०६(१) सह कलम १८४, १३४ मोवाका अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

ओ३म् भूर्भुवः स्वः ।
तत्सवितुर्वरेण्यं भर्गो देवस्य धीमहि ।
धियो यो नः प्रचोदयात् ।।

# लातूर समाचार

## कार्यकर्त्यात उत्साह वाढला

स्थानिक स्वराज्य संस्थेंच्या निवडणुकीत अनेक नवे व जुने चहरे जनतेसमोर येत आहेत. आपणच नगरसेवक व्हावे व जनता आपणास स्विकारेल अशा तुऱ्यात वावणारे नव उत्स्युकामुळे मतदार त्यांच्याकडे पाहुन गप्प आहेत. जनता मतदार कोणाला मनदान करावयाचे आहे हे ठरवुन मतदान करेल, मात्र आम्ही सेवक बनणार असून जनतेची सेवा करणार आहोत अशा नम्रतेने वागत आहेत. त्यात अजून जवळपास सर्वच पक्षात एकी दिसून येत नाही. तसे पाहिले तर स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुका ह्या पक्षविरहित असल्या पाहिजेत. पक्षीय राजकारण म्हटले की, वादाचा विषय निर्माण होऊ शकतो. नगरपरिषद व नगर पंचायत निवडणुका ह्या मर्यादित मतदान असते. त्यामुळे प्रत्येक मतदार व घराघरात संपर्क साधला जातो. एखादा उमेदवार जर आपल्या वार्डात लोकप्रिय असेल तर त्याला अधिक मेहनत घेण्याची गरज नाही. राज्यात तसे पाहिले तर सहा पक्ष इतर ही पक्ष कार्यरत आहेत. त्यात दोन राष्ट्रवादी व दोन शिवसेना आहे. भाजपा एकच आहे त्याची वाढती ताकद आहे. एकेकाळी काँग्रेसची सत्ता देशात होती आता भाजपाची आहे. त्यामुळे चिंतन करावे लागते ते काँग्रेस पक्षाला! आज सर्व पक्षाचे कार्यकर्ते स्वबळावर लढण्याचा विचार व्यक्त करीत असले तरी यश किंवा अपयश आले तर आगामी काळात आघाडी किंवा युती करण्यात कोण आडविणार? त्यामुळे आज स्वबळावर नारा सर्वत्र लावला जात आहे. बहुतांशी स्वबळावच अनेक ठिकाणी लढले जाण्याची शक्यता आहे. मुळात एका बाजूने विचार केलातर योग्य आहे. बिहारमध्ये काँग्रेस पक्षाला अपयश का आले यावर चिंतन केले तर काँग्रेसने आघाडी करून कमी जागा लढल्या, त्याच जर दोनशेवर उमेदवार उभे केले असते तर काँग्रेस पक्षाला अधिक जागा जिंकता आल्या असल्या. कमी जागेवर लढल्याने अतिषय कमी जागा जिंकत्या आल्या. काँग्रेसपक्षाला मोठी चपराक आहे. भाजपा एक-एक राज्य घेत आहे तर काँग्रेसला अपयश येत आहे. यामागील कारणांचा विचार केला पाहिजे. यापुढे जसे मुंबई महानगर पालिकेत स्वबळावर लढण्याचा काँग्रेस पक्षाचा विचार पक्का दिसतो आहे. सत्ता मिळविता आली नाही तर मोठा विरोधी गट निर्माण होवू शकतो. त्यामुळे काँग्रेसने स्वबळावरचा नारा योग्य ठरणारा ठरू शकतो. काँग्रेसने चिंतन केले पाहिजे. त्याच प्रमाणे काँग्रेस पक्षाने उद्धव ठाकरे यांनी जर राज ठाकरे यांच्या मनसे सोबत गेल्यास काँग्रेस महाआघाडी सामील होणार नाही हे ठणकाऊन सांगितले आहेच. त्यात उद्धव ठाकरे व राजठाकरे एकत्र येणार आहेत हे निश्चित समजले जाते. मुंबईत शिवसेनेची चलती आहे. शिवसेनेचे मुंबईत वर्चस्व आहे. शिवसेना व मराठी लोक एक आहेत. राज व उद्धव एकच आहेत. दोघांचा कार्यक्रम समसमान आहे. त्याच प्रमाणे नगर व महानगरपालिकेच्या निवडणुकीत सर्वांनाच स्वतंत्र लढण्याची अपेक्षा वाढती आहे. एकदा स्वबळावर निवडणुका झाल्यानंतर याचा परिणाम काय होईल हे दिसून येणार आहे. आज कितीही काही कोणी सांगितले तरी मुंबईकर शिवसेनेसोबत काही प्रमाणात आहेत हे मान्यच केले पाहिजे. मुळात मुंबई देशाची ज्याकाही आर्थिक राजधानी आहेत त्यापैकी एक आहे. त्यामुळे मराठी माणसाने जे मुंबईसह अखंड महाराष्ट्र मोठे आंदोलन केले, यात अनेक शहीद झाले होते. त्यामुळे महाराष्ट्रीयसाठी मुंबई ही जीवापाड प्रेमाची आहे. मराठी माणूस व शिवसेना हे अतुट नाते संबंधामुळे उद्धव ठाकरे यांना मुंबई महानगरपालिकेत सत्ता मिळेल अशी आशा आहे. मुंबई महानगरपालिका आपल्याच ताब्यात यावी यासाठी भाजपा मोठा प्रयत्न करणार यात शंका नाही. आता पासून भाजपासुद्ध आतून स्वबळावरच निवडणुक लढविण्याचा मनसुबा दिसून येत आहे. राज्यात नगर व महानगर पाहिलेच्या निवडणुका ह्या सर्वच कार्यकर्त्यास स्वबळाच लढण्याचा मनसुबा असल्याने एकदा कार्यकर्त्याच्या मनासारखे होणे अपेक्षित आहे. प्रत्येक पक्षाला आपली ताकद किती आहे हे कळून येणार आहे. यश नाही आले तर पुन्हा आघाडी व युती कोठे गेली नाही. यावेळी मात्र मतदारांनी जागृत राहुन उत्तर दिले पाहिजे. बऱ्याच ठिकणी अपयश आले तर इतर पर्यायाचा विचार केला गेलेला आहे. त्यामुळे अजून प्रत्यक्षात प्रचारास आरंभ झाला नाही. कार्यकर्ते झाडून कामाला लागले नाहीत. आगामी आठवड्यात मात्र प्रचारात जोर येण्याची शक्यता आहे. निवडणुक म्हटले की, नेते मंडळी अनेक पैलूने विचार करीत असतात. एखादेवेळी अपयश आले तर दुसरा पर्याय मनात असतो. त्यामुळे केवळ निवडणुका जिंकणे हाच उद्देश प्राथमिक स्वरूपात असतो. निवडणुकीत तसे पाहिले तर सध्याच्या स्थितीत आघाडी किंवा युतीची शिवाय शक्य दिसून येत नाही. निवडणुकीत गटा बरोबर, जात हा फॅक्टर मोठ्या प्रमाणात चालतो. निवडणुका ह्या स्वच्छंद वातावरणात होणे अपेक्षित असते. स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीत मर्यादित क्षेत्र असल्याने सर्वच उमेदवार हा मनलावुन प्रचारात मग्न असतात. एक मात्र उमेदवार व मतदारास पर्याय अनेक हाती आले आहेत. पुर्वी काँग्रेस व डावी आघाडी म्हणजे शेकाप किंवा जनता दल असा पर्याय होता. आता जवळपास सह पक्ष निवडणुक रिंगणात दिसून येतात. एकी झाली तर ठिक नसता स्वतंत्र लढण्यात तयार असतात. त्यात बंडखोरी ही ठरलेली असते. स्थानिक स्वराज्य संस्थेत अपक्ष लढणारे कमी नसतात. त्यामुळे यावेळीची स्थानिक स्वराज्य संस्थेची निवडणुक ही आश्चर्याचा धक्का बसणारी दिसून येणार आहे. अगोदरच कोरोनामुळे स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुका लांबल्या होत्या. अनेकजन निवडणुका कधी होतील याकडे लक्ष ठेऊन होते. अनेक ठिकाणी पक्षाच्या बैठका होत आहेत, त्या बैठकीतून प्रत्येक पक्ष हा श्रेष्ठीचे आदेश न मानता, स्वबळावरच निवडणुका लढण्याचा विचार समोर येत आहे. त्यामुळे पक्ष श्रेष्ठींना यावेळी माघार घेऊन बंडखोरीस समोरे जावे लागणार आहे. त्याच प्रमाणे प्रत्येक पक्ष हा स्वबळावर लढला तरच आपली ताकद किती आहे हे समजुन येणार आहे. कोणाची ताकद किती आहे हे यावेळी कळून येणार आहे. यामुळे एक फायदा तरी होईल किंवा ताकद तरी कळेल हे दोन प्रकार दिसून येणार आहेत. त्यामुळे जेथे स्वबळावर लढण्याचा विचार होईल तेथे विरोध न करणे पक्षासाठी हीताचे ठरणारे आहे.

# ग्रामीण आरोग्याचा समाजशास्त्रीय प्रवास : सर्वसमावेशक आणि सशक्त भारताची पायाभरणी

भारताच्या विकासाच्या वाटचालीत ग्रामीण समाज हा कणा मानला जातो. देशाच्या एकूण लोकसंख्येपैकी दोन-तृतीयांश लोक अजूनही ग्रामीण भागात राहतात. अशा समाजाची प्रगती ही केवळ आर्थिक उत्पादनात कशी वाढ होते यावरच अवलंबून नसते, तर त्यांच्या आरोग्यस्थितीची गुणवत्ता कशी आहे, आरोग्यसेवा किती उपलब्ध आहे, सामाजिक सुरक्षितता किती मजबूत आहे आणि लोकांना त्यांच्या मूलभूत हक्कांबद्दल किती जागरूकता आहे, यावरही अवलंबून असते. ह्याच वास्तवाच्या प्रकाशात दरवर्षी नोव्हेंबर महिन्याच्या तिसऱ्या गुरुवारी साजरा केला जाणारा 'राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य दिन' महत्त्वाचा ठरतो. या वर्षी २० नोव्हेंबर रोजी साजरा होणारा हा दिवस ग्रामीण आरोग्य व्यवस्थेतील अडचणी, संधी, नवीन उपक्रम आणि आरोग्य क्षेत्रातील सामाजिक असमानता यांवर चर्चा करण्याची संधी देतो. समाजशास्त्रीय दृष्टीकोनातून ग्रामीण आरोग्य म्हणजे केवळ वैद्यकीय सेवांचा विषय नाही; ते समाजरचनेचे, सामाजिक मूल्यांचे, आर्थिक परिस्थितीचे, स्त्री-पुरुष संरचनेचे, सामाजिक न्यायाचे आणि शासनव्यवस्थेच्या कार्यक्षमतेचे व्यापक प्रतिबिंब आहे.

ग्रामीण आरोग्याच्या इतिहासाकडे पाहिले तर स्वातंत्र्यानंतर देशाच्या सार्वजनिक आरोग्य व्यवस्थेचा पाया 'प्राथमिक आरोग्य केंद्रां'तून घातला गेला. ग्रामीण जनतेच्या आरोग्य समस्यांकडे लक्ष देण्यासाठी उपकेंद्र, प्राथमिक केंद्र, तालुका रुग्णालये, जिल्हा रुग्णालये अशी शासकीय पातळीवरील रचना अस्तित्वात आली. मात्र, संरचना उभी राहिली तरी लोकांपर्यंत सेवा किती पोहोचली, या प्रश्नाचे उत्तर मात्र नेहमीच सकारात्मक नाही. अनेक दशकांपासून ग्रामीण भागातील आरोग्यसेवांची कमतरता सुस्पष्ट आहे. डॉक्टरांची अनुपलब्धता, प्रशिक्षित कर्मचारी नसणे, औषधांची कमतरता, रुग्णवाहिकांची अनुउपलब्धता, दळणवळणातील अडथळे, कमी शिक्षण आणि गरिबी यामुळे आरोग्याच्या मूलभूत सेवांपासून ग्रामीण जनता अनेकदा वंचित राहते.

समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून आरोग्य म्हणजे 'आजार नसणे' एवढेच नाही, तर आरोग्य व्यक्तीच्या सर्वांगीण कल्याणाचा विषय आहे. ग्रामीण समाजात आरोग्याच्या रूग्णतेला आणि आरोग्यसेवा वापरण्याला अनेक सामाजिक घटक कारणीभूत असतात. जातिनिहाय व्याप्त असमानता, जमीनधारणेतील विषमता, महिलांची दुय्यम सामाजिक अवस्था, अंधश्रद्धा, कुपोषण, बालविवाह, स्वच्छतेचा अभाव आणि लोकांमध्ये आरोग्य शिक्षणाची कमतरता या समस्या आरोग्य व्यवस्थेच्या सुधारणेला अडथळा ठरतात. ग्रामीण महिलांच्या आरोग्याचा विचार केला तरी त्यांच्याकडे आरोग्यासाठी स्वतंत्र निर्णयक्षमता नसते. कुटुंबातील घरगुती आणि कृषी कामाचा प्रचंड भार, प्रसूतीनंतर योग्य काळजी न मिळणे, कुपोषण, आणि मासिक पाळीविषयी असलेली गुप्तता या समस्या आजही गंभीरपणे समोर येतात. त्यामुळे आरोग्य हा विषय वैद्यकीय पेक्षा अधिक समाजशास्त्रीय बाजू घेऊन येतो.

राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य दिन आपल्याला या असमानतेच्या मूळ कारणांकडेही विचार करण्यास प्रवृत्त करतो. ग्रामीण समाजात आर्थिक असमानता ही आरोग्यासाठी सर्वात मोठी अडचण ठरते. अल्पभूधारक शेतकरी, भूमिहीन मजूर, तात्पुरते काम करणारे हातमजूर, हंगामी स्थलांतर करणारे कामगार, आदिवासी समाज या सर्वांना आरोग्याच्या सुविधांचा वापर करणे अधिक कठीण जाते. त्यांच्या उत्पन्नाची अस्थिरता आणि दररोज मिळणाऱ्या मजुरीवर चालणारे जीवन हे त्यांना मोठ्या आजारांचे खर्च पेलू देत नाही. आरोग्य विम्याबद्दलच्या योजनांची जागरूकता कमी असल्याने सरकारी योजना लोकांपर्यंत पोहोचतच नाहीत.

अजूनही ग्रामीण भारतात औषधोपचारापेक्षा झटपट इलाज मिळवण्यासाठी लोक पारंपरिक उपचारपद्धतींकडे वळतात. अंधश्रद्धा, जादूटोणा, झाडफूंक, गावातील भोळेपणा, सामाजिक दडपण, चिकित्सकांवरील अविश्वास या कारणांमुळे आजारांचा वेळीच उपचार होत नाही. आरोग्याचे सामाजिक निर्धारक घटक शिक्षण, स्वच्छ पाणी, स्वच्छता, पोषण, आर्थिक स्थैर्य यांची उपलब्धता नसल्यास कोणतीही आरोग्य योजना समाजावर दीर्घकालीन परिणाम करू शकत नाही. सरकारचे 'स्वच्छ भारत अभियान', 'उज्ज्वला योजना', 'राष्ट्रीय आरोग्य अभियान', 'जनआरोग्य योजना' अशा उपक्रमांचे उद्दिष्ट ग्रामीण समाजाचे आरोग्य सुधारण्याकडे आहे; मात्र या योजनांच्या परिणामकारकतेसाठी समाजातील असमानता आणि सामाजिक प्रतिबंध दूर करणे अधिक आवश्यक आहे.

ग्रामीण आरोग्य व्यवस्थेत आशा कार्यकर्त्यांचे योगदान विशेष महत्त्वाचे आहे. समाजाच्या प्रत्येक कुटुंबाशी संपर्क ठेवून गर्भवती स्त्रियांचे निरीक्षण करणे, बालकांचे लसीकरण करणे, आरोग्यविषयक जनजागृती करणे, पोषणाविषयी मार्गदर्शन करणे, क्षयरोग, मलेरिया, कुपोषण यांसारख्या आजारांची माहिती देणे अशा अनेक जबाबदाऱ्या त्या पार पाडतात. या आशा कार्यकर्त्या ग्रामीण आरोग्य आणि शासनव्यवस्था यांच्यामधील दुवा मानल्या जातात. त्यांचे कार्य समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून ग्रामीण महिलांच्या सक्षमीकरणाचेही द्योतक आहे.

ग्रामीण भारतातील आरोग्यविषयक आव्हानांची चर्चा करताना 'आदिवासी समाजा'चा मुद्दा अधिक महत्त्वाचा ठरतो. भौगोलिकदृष्ट्या दुर्गम भाग, दळणवळणाची कमतरता, जंगलातील वास्तव्य, आरोग्य सुविधांपासून दुरावा, शिक्षणाचा अभाव, गरीबी, पारंपरिक जीवनशैली, पोषणाची कमतरता, अंधश्रद्धा या सर्व कारणांमुळे ग्रामीण भागातील आणि विशेषतः आदिवासी भागातील आरोग्य समस्या अधिक तीव्र आहेत. क्षयरोग, मलेरिया, कुपोषण, बालमृत्यू, मातामृत्यू दर या समस्या आजही गंभीर स्वरूपात दिसतात. त्यामुळे ग्रामीण आरोग्य सुधारण्यासाठी सर्वात प्रथम आदिवासी आणि अत्यंत वंचित गटांवर विशेष लक्ष देणे आवश्यक आहे.

ग्रामीण आरोग्य दिन साजरा करताना आपल्याला आरोग्याच्या पायाभूत सुविधांबद्दलही बोलावे लागेल. प्राथमिक आरोग्य केंद्रे ही ग्रामीण आरोग्य धोरणाची पहिली पायरी असली, तरी अनेक ठिकाणी ही केंद्रे कर्मचारीअभावी कार्य करू शकत नाहीत. डॉक्टर असले तरी तज्ञ डॉक्टरांची कमतरता मोठी आहे. काही ठिकाणी औषधे उपलब्ध नाहीत, निदान सुविधा अपुऱ्या आहेत, तर काही ठिकाणी इमारती आहेत पण उपकरणे नाहीत. हे चित्र बदलायचे असेल तर आरोग्य क्षेत्रात अधिक निधीची गुंतवणूक, लोकाभिमुख धोरणे आणि स्थानिक स्तरावर आरोग्य व्यवस्थापनातील पारदर्शकता आवश्यक आहे.

डिजिटल हेल्थ आणि टेलिमेडिसिन ही नवीन संधी ग्रामीण आरोग्य व्यवस्थेला बळ देऊ शकते. मोबाईल नेटवर्क, डिजिटल कनेक्टिव्हिटी आणि इंटरनेट सुविधांचा ग्रामीण भागात जलद प्रसार झाल्याने डॉक्टरांशी ऑनलाइन सल्लामसलत करणे शक्य होत आहे. तरीही या संधीचा पूर्ण लाभ घेण्यासाठी डिजिटल साक्षरता, तांत्रिक पायाभूत सुविधा आणि नेटवर्क सेवा सुधारण्याची गरज आहे. आरोग्य शिक्षण हा ग्रामीण आरोग्याचा सर्वात महत्त्वाचा पाया म्हणता येईल. लोकांना आरोग्यविषयक माहिती मिळाल्यास ते स्वतःच्या आरोग्याबद्दल अधिक सजग होतात. लसीकरण, स्वच्छता, पोषण, स्त्रीआरोग्य, बालआरोग्य, मानसिक आरोग्य या विषयांवरील जनजागृती ही आरोग्य सुधारण्याची कळीची रणनीती आहे.

ग्रामीण आरोग्य व्यवस्थेतील सामाजिक न्यायाचा मुद्दाही दुर्लक्षित करता येत नाही. समाजात जात, वंश, आर्थिक वर्ग, लिंग अशा विविध आधारांवर लोकांमध्ये निर्माण होणाऱ्या असमानतेचा थेट परिणाम आरोग्याच्या उपलब्धतेवर होतो. समाजशास्त्रीय अभ्यासातून असे दिसून येते की वंचित समाजातील लोकांना आरोग्य सेवांसाठी अधिक अडचणींचा सामना करावा लागतो. त्यामुळे आरोग्य धोरणांची आखणी करताना सामाजिक न्यायाच्या तत्त्वाचा योग्य वापर करणे हे शासनाचे महत्त्वाचे कर्तव्य ठरते.

आरोग्य आणि पर्यावरणाचा संबंधही ग्रामीण समाजात महत्त्वाचा आहे. शुद्ध पाण्याची उपलब्धता, शौचालये, कचरा व्यवस्थापन, स्वच्छ हवा, सुरक्षित निवासस्थान, शाश्वत शेती पद्धती यांचा आरोग्यावर थेट परिणाम होतो. हवामान बदलामुळे उद्भवणाऱ्या नवीन रोगांची जोखीमही ग्रामीण भागात अधिक आहे. त्यामुळे आरोग्याचा विचार करताना पर्यावरण संवर्धन आवश्यक बनते.

राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य दिन हा केवळ आरोग्यसेवा व्यवस्थेचा आढावा घेण्याचा दिवस नाही; तर तो ग्रामीण समाजाच्या समृद्धीच्या, सामाजिक समतेच्या, मानवाधिकारांच्या आणि सर्वसमावेशक विकासाच्या दिशेने वाटचाल करण्यासाठी प्रेरणा देणारा दिवस आहे. मजबूत आणि कार्यक्षम ग्रामीण आरोग्य व्यवस्था असेल तरच देशाचा वास्तविक विकास घडू शकतो. आरोग्य हा प्रत्येकाचा मूलभूत हक्क आहे तो समाजाच्या सर्व स्तरांपर्यंत पोहोचवण्यासाठी शासन, आरोग्य कर्मचारी, स्थानिक संस्था, स्वयंसेवी संस्था, शेतकरी, महिला, युवक आणि संपूर्ण समाजाने एकत्रित प्रयत्न करणे आवश्यक आहे.

आज या राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य दिनानिमित्त आपण सर्वांनी एक संकल्प करूया की ग्रामीण भारतातील आरोग्यसेवा 'सर्वांसाठी, सर्वत्र आणि सर्वकाळ' उपलब्ध करून देण्याचा. समान, समावेशक आणि न्याय्य आरोग्य व्यवस्था हीच सशक्त भारताची पायाभरणी आहे. ग्रामीण आरोग्य बळकट करणे म्हणजेच राष्ट्राच्या भविष्याची आरोग्यपूर्ण वीट रचणे होय. ग्रामीण भारत निरोगी असेल, तरच भारताचा विकास खऱ्या अर्थाने सक्षम आणि शाश्वत ठरेल.

**डॉ. राजेंद्र बगाटे**



**(लेखक समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत)**
**मो. ९९६०१०३५८२,**

# काळे मनुका अनेक आजारांवर एक उपाय, सेवन करताना फक्त घ्या काळजी

हिरवे आणि पिवळे मनुके बहुतेक लोकांच्या घरात चवीने खाल्ले जातात. पण तुम्हाला काळ्या मनुकाचे आरोग्य फायदे माहित आहेत का आयुर्वेदात, हे सुपरफूड्समध्ये मानल जाते. ज्याचे सेवन सामान्यतः प्रत्येकासाठी चांगले मानले जाते. जर तुम्ही काळ्या मनुका सेवन करत नसाल तर आजपासूनच याला तुम च्या आहाराचा भाग बनवा. कारण मनुके शरीरासाठी आरोग्यदायी फायदे आहेत.

काळ्या मनुका काळ्या द्राक्षापासून बनवल्या जातात. यामध्ये फायबर, प्रोटीन, पोटॅशियम, लोह, तांबे, व्हिटॅमिन बी ६ इत्यादी पोषक घटक असतात. आयुर्वेदिक डॉक्टर वैशाली शुक्ला यांनी तिच्या इंस्टाग्रामवर एक व्हिडिओ पोस्ट करून त्याचे आश्चर्यकारक फायदे आणि ते कसे खावे याबद्दल माहिती दिली आहे.

एल्कलाइन गुणांनी समृद्ध

जेव्हा शरीराची पीएच पातळी आम्लयुक्त असते, तेव्हा एखाद्याला ॲसिडिटी, छातीत जळजळ, छातीत जळजळ आणि तोंडात व्रण यांसारख्या समस्यांना तोंड द्यावे लागते. काळ्या म नुकामध्ये असलेले कूलिंग गुणधर्म आणि क्षारीय गुणधर्म या सर्व समस्यांपासून संरक्षण देतात. काळ्या मनुक्यामध्ये सौम्य रेचक गुणधर्म आहेत, जे चांगले आतडे आरोग्य राखण्यास मदत करतात.

या पद्धतीने करा सेवन

शरीराची पीएच पातळी क्षारीय करण्यासाठी ८ ते १० काळे मनुके रात्रभर पाण्यात भिजत ठेवा. सकाळी उठल्यानंतर रिकाम्या पोटी याचे सेवन केल्यास काही दिवसातच चांगले परिणाम मिळतील.

ताकद वाढवेल

जर तुम्हाला सतत थकवा जाणवत असेल किंवा तुमच्यामध्ये दैनंदिन काम ांसाठी ऊर्जा आणि तग धरण्याची कम तरता असेल तर काळ्या मनुका खाणे खूप उपयुक्त ठरू शकते. यासाठीही काळे मनुके रात्रभर भिजवून रिकाम्या पोटी खाण्याचा सल्ला दिला जातो. याचे सेवन केल्याने तुमचे शरीर ताजेतवाने आणि उत्साही असेल.

त्वचा आणि केसांसाठी पोषक

काळ्या मनुका हे अँटिऑक्सिडंट्सचा चांगला स्रोत मानला जातो. यासोबतच यामध्ये व्हिटॅमिन-सी, व्हिटॅमिन-ए, फ्लेव्होनॉइड्स आणि आयर्न असतात, ज्यामुळे त्वचा आणि केस दोघांसाठीही याचे अनेक फायदे आहेत. तसेच, काळ्या मनुकामध्ये काही गुणधर्म असतात जे रक्त शुद्ध करतात. यामुळे त्वचा केवळ निरोगी आणि चमकदार दिसते. तसेच त्वचेशी संबंधित समस्यांपासून आराम मिळू शकतो.

बरेच फायदे

मनुक्यामध्ये कमी चरबी आणि उच्च ऊर्जा गुणवत्ता आहे. त्यामुळे जेव्हाही तुम च्याकडे नाश्ता करायला वेळ नसेल किंवा तुम्हाला जिमला जायला उशीर झाला तरर ६-८ मनुके खाल्ल्याने तुम्हाला उत्साही वाटेल.

मनुका खाल्ल्याने पचनसंस्थाही निरोगी राहते, त्यात असलेले फायबर शरीरातील विषारी पदार्थ बाहेर टाकते. यासाठी ८-१० मनुके दुधात चांगले उकळा. नंतर त्याचे सेवन करा. यामुळे बद्धकोष्ठतेच्या समस्येपासून आराम मिळू शकतो.

मनुका खाल्ल्याने व्हिटॅमिन बी कॉम्प्लेक्सची कमतरता भरून निघते. याशिवाय यामध्ये तांबे मुबलक प्रमाणात असते, जे लाल रक्तपेशी तयार होण्यास मदत करते. ८-१० मनुके रात्री पाण्यात भिजत ठेवा आणि सकाळी खा, यामुळे अशक्तपणा दूर होईल.

# कागदात हरवलेले, कायद्यात सापडलेले: Unclaimed Money चे भारतीय तत्त्वज्ञान

धनं नित्यमन्वेष्टव्यं न हि सुप्तस्य सिंहस्य प्रविशन्ति मुखे मृगाः। - मनु स्मृती

धनाचा शोध घेतल्याशिवाय ते लाभत नाही; झोपलेल्या सिंहाच्या तोंडात शिकार स्वतःहून जात नाही.

भारताच्या आर्थिक व्यवस्थेबद्दल बोलताना आपण नेहमी बँकिंग, गुंतवणूक, विमा, बाजारपेठ आणि परतावा यांचा विचार करतो; परंतु या चमकदार पृष्ठभागाखाली एक अगदी वेगळी दुनिया आहे-अनक्लेम्ड मनीची. देशातील लाखो नागरिकांच्या नावावर असलेल्या ऋऊ, ठऊ, बचत खाते, डिव्हिडंड, शेअर्स, विमा रक्कम किंवा NPS योगदान हे सर्व कधी कधी विसरलेल्या संपत्तीत परिवर्तित होते. ही रक्कम हरवलेली नसते; ती फक्त कायदेशीर चौकटीत जपलेली असते, आणि मालकाच्या शोधाची वाट पाहत असते.

RBI च्या Your Money, Your Right उपक्रमामुळे नागरिकांना आपल्या विस्मरणात गेलेल्या धनाचा शोध घेण्यासाठी केंद्रीकृत सुविधा उपलब्ध झाली आहे. खाली या संपूर्ण विषयाचा अधिकृत, धोरणाधिष्ठित आणि प्रावधानांवर आधारित आढावा दिला आहे.

१) RBI - अनक्लेम्ड ठेवी आणि DEA Fund (१० वर्ष नियम)

बँक खात्यावर १० वर्षे कोणताही व्यवहार नसल्यास ते खाते निष्क्रिय मानले जाते. या कालावधीनंतर FD, RD, बचत खाते, चालू खाते, कॅश क्रेडिटमधील क्रेडिट, NEFT/RTGS reversal, DD, Pay Order, Prepaid Card शिल्लक-अशी सर्व रक्कम RBI च्या Depositor Education and Awareness (DE-) Fund मध्ये हस्तांतरित होते.

या प्रक्रियेत महत्त्वाचे म्हणजे-ग्राहकाचा हक्क कधीच संपत नाही. रक्कम RBI कडे गेली तरी, दावा थेट संबंधित बँकेतूनच करता येतो. त्यानंतर बँक रक्कम ग्राहकाला देऊन RBI कडून परतावा मागते.

RBI ने UDGAM Portal तयार केले आहे - जिथे देशातील ९०% अनक्लेम्ड ठेवी एकाच ठिकाणी सर्च करता येतात. तथापि, दावा करणे हा हक्क केवळ बँकेकडेच आहे.

दाव्यासाठी IBA चा अधिकृत फॉर्म, अद्ययावत KYC, आणि मृत खातेदाराच्या बाबतीत NOMINATION/वारस दस्तऐवज आवश्यक असतात.

२) Mutual Funds - UDRS मधील Unclaimed Dividend/Redemption म्युच्युअल फंडातील रक्कम अनक्लेम्ड राहण्याचे प्रमुख कारण म्हणजे वेळेत अपडेट न केलेले बँक तपशील, बदललेला पत्ता, किंवा घधउ विसंगती.

AMC कडे ही रक्कम एक विशेष स्कीम-Unclaimed Dividend and Redemption Scheme (UDRS)-मध्ये राखली जाते.

तीन मुख्य नियमः

३ वर्षांच्या आत दावा - NAV appreciation गुंतवणूकदारालाच मिळतो.

(B) ३ वर्षांनंतर - Appreciation Investor Education Fund मध्ये जातो, परंतु मूळ रक्कम ग्राहकास कायम मिळते.

(C) फोलिओ अपडेट केल्यास - AMC स्वतः redemption जारी करू शकते.

सर्व AMC चे unclaimed status शोधण्यासाठी MF Central - MITRA हे एकीकृत व्यासपीठ उपयुक्त आहे.

३) IEPF - Shares d Dividend (७ वर्ष नियम)

Companies Act 2013 नुसार, एखाद्या कंपनीचा ऊीींळवशपव सात वर्षे अनक्लेम्ड राहिला तर तो खएझऋ कडे जातो. सर्वात महत्त्वाची बाब म्हणजे - या Dividend शी संबंधित Shares सुद्धा IEPF मध्ये हस्तांतरित होतात.

दाव्याची प्रक्रिया:

MCA पोर्टलवरील IEPF-5 फॉर्म भरावा

मूळ शेअर सर्टिफिकेट, KYC, बँक तपशील, CML, Indemnity Bond

कंपनी पडताळणी करून IEPF कडे रिपोर्ट पाठवते

IEPF कडून शेअर्स गुंतवणूकदाराच्या Demat खात्यात परत येतात

या दाव्यास कधीही वेळमर्यादा नाही.

४) IRDAI - Unclaimed Insurance SCWF (१० + २५ वर्ष नियम)

विमा पॉलिसीधारक किंवा नॉमिनीशी संपर्क न झाल्यामुळे १२ महिने अनपेड राहिलेली रक्कम अनक्लेम्ड मानली जाते. विमा कंपन्या ही रक्कम १० वर्षे स्वतःकडे Unclaimed Fund मध्ये ठेवतात. त्यानंतर ती रक्कम Senior Citizens' Welfare Fund (SCWF) मध्ये वर्ग होते. SCWF मध्ये गेल्यानंतरही ग्राहक किंवा नॉमिनीला २५ वर्षे दावा करण्याचा अधिकार असतो. त्यानंतरच रक्कम सरकारकडे वर्ग होते. दावा करताना विमा कंपनीला मूळ रक्कम + गुंतवणुकीवरील उत्पन्न देणे कायदेशीरदृष्ट्या बंधनकारक आहे. सर्व विमा पॉलिसींची अनक्लेम्ड स्थिती एकत्र शोधण्यासाठी Bima Bharosa Portal उपयुक्त आहे.

५) NPS - SPCP- (7 df© + 25 df© Claim Window)

Points of Presence (POP) कडून प्राप्त झालेली NPS रक्कम काही वेळा PRAN मध्ये जमा न होता शिपवळपस राहते. अशा रकमेचे ७ वर्षांनंतर Subscribers' Pension Contribution Protection Account (SPCPA) मध्ये वर्गीकरण केले जाते.

येथील नियम अत्यंत नागरिकहिताचे आहेत -

सब्स्क्राइबर किंवा त्यांचे वारस २५ वर्षांपर्यंत दावा करू शकतात.

दाव्यानंतर परत दिली जाणारी रक्कम:

मूळ योगदान

POP कडून घेतलेला उेशिपीरींळेप

PFRDA ठरवलेले व्याज

अनक्लेम्ड Money का वाढते?

नॉमिनी नसणे

मोबाईल/ईमेल/पत्ता न अपडेट करणे

वारसांना आर्थिक माहिती न देणे

दस्तऐवज हरवणे

बँक/कंपन्यांची विलीनीकरणे

पेपर शेअर्स/जुने ऋऊ विसरणे

परदेशातून परतल्यावर खाती न वापरणे

आर्थिक शिस्तीसाठी १० आवश्यक सवयी

१. सर्व खात्यांत योग्य Nominee
२.adhaar-PAN-Mobile-Email अद्ययावत
३. DigiLocker मध्ये सर्व पॉलिसी/FD/MF कागदपत्रे
४. Family Financial Folder
५. वार्षिक UDGAM / MF Central / IEPF तपासणी
६. खाते निष्क्रिय न ठेवणे
७. Will / वारसा नियोजन
८.एकच मोबाईल नंबर सर्व गुंतवणुकींसाठी
९.पत्ता बदलल्यास तत्काळ अपडेट
१०.कुटुंबाशी स्पष्ट आर्थिक संवाद

समारोप

भारताच्या वित्तव्यवस्थेने अनक्लेम्ड पैशाचे संरक्षण करण्यासाठी अनेक स्तरांवर मजबूत यंत्रणा उभारली आहे. आज पैसा हरवतो नाही; तो फक्त कायदेशीर चौकटीत संरक्षित होऊन बसलेला असतो-जोपर्यंत त्याचा मालक पुढे येत नाही.

तुमची संपत्ती कागदात हरवली असेल, पण कायद्याने ती तुम्हाला परत मिळते-जर तुम्ही तिला शोधण्याचा निर्णय घेतला तर.



**लेखक : नवनीत भंडारी**
**व्यवस्थापकीय संचालक - लातूर अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक लि.**
**अध्यक्ष - सहकार भारती, लातूर जिल्हा**




# वजन कमी आणि सौंदर्यासाठी आवळ्याचा जादुई फॉर्म्युला

मुंबई : शरीर निरोगी ठेवण्यासाठी योग्य आणि संतुलित पोषण मिळणे अत्यंत आवश्यक असते. व्हिटॅमिन सी आणि अँटीऑक्सिडंट्सने परिपूर्ण असलेला आवळा हा आरोग्यासाठी अतिशय उपयुक्त मानला जातो. केस, त्वचा आणि पचनाशी संबंधित अनेक समस्या दूर करण्यासाठी आवळ्याचा वापर फायदेशीर ठरतो. आहारात आवळ्याचा समावेश अनेक प्रकारे करता येतो - काहीजण तो भाजी स्वरूपात खातात, तर काहींना कच्चा आवळा खाणे आवडते.

रस तयार करण्यासाठी लागणारे साहित्य - आवळा, कच्ची हळद, आले, कढीपत्ता आणि काळी मिरी.

हा रस तयार करण्याची पद्धत अगदी सोपी आहे. एका आवळ्यासोबत कच्च्या हळदीचा एक छोटा तुकडा, आल्याचा तुकडा आणि चिमूटभर काळी मिरी घ्या. हे सर्व घटक मिक्सरमध्ये एकत्र वाटून रस तयार करा.



सकाळी रिकाम्या पोटी हा रस प्यायल्याने शरीराला अनेक फायदे होतात. दररोज या रसाचे सेवन केल्याने त्वचेला नैसर्गिक तेज येते, केस मजबूत व मऊ राहतात आणि वजन कमी होण्यासही मदत होते. जर तुम्हाला केसगळती कमी करायची असेल आणि चेहऱ्यावर नैसर्गिक चमक आणायची असेल, तर या पेयाला तुमच्या दिनक्रमाचा भाग जरूर बनवा.

वजन कमी करण्याच्या प्रक्रियेत आवळ्याची भूमिका महत्त्वाची आहे. तो शरीरातील चयापचय वाढवतो आणि चरबी जळण्याची गती सुधारतो. याशिवाय भूक आणि अनावश्यक खाण्याची इच्छा नियंत्रित ठेवण्यासही तो मदत करतो. त्यामुळे निरोगी केस, त्वचा आणि सडपातळ शरीर हवे असल्यास आवळ्याचा आहारात नियमित समावेश करा.



# भिंतीवरील सुविचारांनी मुले प्रगल्भ होतात का?

आपण शाळांच्या भिंती पाहिल्या असतील, तर शाळांच्या भिंतीवर सातत्याने जे लिहिलेले असते, ते मुलांच्या भावविश्वातील किती हा प्रश्न आहे. अनेकदा त्यावर मोठमोठ्या विचारांची दिशा दाखवणारे सुविचार लिहिलेले असतात. हे सुविचार विद्यार्थ्यांना खरेच समजतात का? या विद्यार्थ्यांच्या ज्ञानात भर टाकण्यासाठी करण्याचा विचार त्यामागे असू शकेल; मात्र ज्या विचाराने विद्यार्थ्यांच्या मनामध्ये प्रेरणा निर्माण होईल, त्यांना ते वाचल्यावर शिकावे असे वाटेल असा काही मजकूर तेथे असायला हवा. आपल्याला मात्र वर्ग खोल्यांच्या चारी बाजूला बोधवाक्याने सजवलेल्या भिंती करण्यातच अधिक रस वाढत चालला आहे. या सुविचारांनी मुलांची भाषा खरच विकसित होते का? त्यांच्या भाषा विकासाशी या बोधवाक्यांची सांगड घालता येते का? मुलांना त्याचा नेमका अर्थ कळतो का? की केवळ पाठांतराच्या जोरावर ही सुवचने वाचून विद्यार्थी पुढे जात राहतात?

**आनंदाची वाट हरवली**

भिंतीवरील मजकूर हा शिक्षणाला गती देणारा, विद्यार्थ्यांची जिज्ञासा उंचावणारा असायला हवा; मात्र आपण सध्या ज्या वाटा चालत आहोत, त्याचा बालकांच्या शिक्षण म्हणून त्याचा किती परिणाम होतो आहे हे आपण समजून घ्यायला हवे. कृष्णकुमार नावाचे शिक्षणतज्ज्ञ यांनी यासंदर्भात केलेला विचार अधिक चिंतन करायला भाग पाडणारा आहे. त्यांनी म्हटले आहे, की बोधवाक्याच्या जागी कवितांची भित्तीपत्रके लावता येतील. त्यावर मोठ्या अक्षरात लिहिलेल्या कविता आणि सोबत चित्र असू शकते. शाळेत मोठी मुले कविता लिहितील. छोटी मुले त्या अनुषंगाने चित्र काढतील. अर्थात बोधपर कविता निवडताना वाचायला गंमत वाटेल अशा मजेशीर कविता निवडायला हव्यात. मुलांना आवडणारा मजकूर भिंतीवर लावावा. आवडणार्‍या कविता निवड कराव्यात अशी भित्तिपत्रके कायम बदलत राहायला हवे. ती सातत्याने बदलली जातील याची काळजी घेतली जायला हवी. आज मात्र आपल्या अवतीभोवती असलेल्या शाळांच्या भिंती कायमस्वरूपी रंगाने रंगवल्या जातात. तो मजकूर वाचल्यानंतर त्याने विचार करावा, चिंतन करावे, मनन करावे अशी अपेक्षा आहे; मात्र आपण जर मुलांना बोध होईल असे काही नसले तर मुलांच्या आयुष्यातील मजकुराची आनंदाची वाट हरवली जाते.

या भिंती सजवणे, नटवणे याचा संबंध मुलांच्या शिक्षणाशी आहे का? याचा शोध घेण्याची गरज आहे. आज केवळ मुलांच्या आयुष्यात आदर्शाच्या वाटा निर्माण करण्यासाठीचे हे प्रयत्न केले जात आहेत; मात्र या प्रयत्नांचा परिपाक विद्यार्थ्यांच्या मनावर होताना दिसत नाही. भिंतीवरील हे सारे शब्द, वाक्यांच्या माध्यमातील मजकूर मुले फक्त वाचत जातात. वाचलेल्या मजकुराचा परिणाम होण्यासाठी मुलांना अर्थ शोधावा लागतो. तो अर्थ शोधण्याची वाट वर्तमानातील शाळांचा स्तर, विद्यार्थ्यांचा वयोगट, त्यांचा भाषिक विकासाचा स्तर लक्षात घेता तसा परिणाम निर्माण होतो का आज दुर्दैवाने शाळा, शिक्षण संस्थांच्या भिंती म्हणजे केवळ बोधवाक्यांचा वाटेचा प्रवास आहे असे वाटू लागले आहे. शाळा सजवल्या जात आहेत. त्या सजवण्यामध्ये मुलांच्या शिक्षणाचा किती खोल विचार आहे? याचा शोध घेण्याची आवश्यकता आहे. भिंती बोलकी असाव्यात याचा नेमका अर्थ काय? याचा विचार कधी करणार की नाही?

प्रत्येकालाच आपले मूल म्हणजे आपल्या डोळ्यासमोर निर्माण केलेल्या आणि रेखाटलेल्या चित्राप्रमाणे आदर्शाच्या वाटेचे व्यक्तिमत्त्व घडवायचे आहे. कोणाला तरी आपल्या मुलाला शिवाजी महाराजांसारखे घडवायचे असते, कोणाला तुकारामांसारखे, कोणी ज्ञानेश्वरांसारखे, कुणाला मुक्ताईसारखे, कोणाला सचिन तेंडुलकर, तर कोणाला लता मंगेशकर यांसारखे आपले मूल घडवण्याची स्वप्ने असतात. म्हणून मुलांना या वयामध्ये असे काही ऐकवले, वाचवले जाईल म्हणजे मुले तशी घडतील अशी अपेक्षा त्यांची असते; मात्र आपण कोणत्या वयात काय पेरतो आहोत याचा तरी विचार करायला हवा. त्या दिशेने मूल घडवले जाण्याचा प्रयत्न केला जातो; पण अशा प्रकारच्या वाटा लहान वयात आपण निर्माण केल्या, तर त्याचा कोणताही परिणाम मुलांच्या मनावर होतो का? याबद्दल शंकाच आहे. शेवटी आरंभीच्या कालखंडात साक्षरतेचा विचार अधिक महत्त्वाचा ठरतो आहे. ती साक्षरता दबावातून, तणावातून सक्तीने निर्माण करण्याचा प्रयत्न होतो आहे. असे बोजड काही दिले तर शिकण्याचा आनंद हरवण्याची शक्यता आहे.



**सुवचनांचा शिक्षणाशी संबंध?**

परवा एका शाळेच्या आवारामध्ये नेहमीप्रमाणे भिंतीवर एक सुविचार लिहिला होता. नेहमी खरे बोलावे, हा महात्मा गांधींच्या विचारातील एक सुवचन त्यावर नोंदवले होते; पण हे सुवचन रोज वाचूनही विद्यार्थी खरंच खरे बोलतात का? याचा शोध घ्यायला हवा. एका शाळेच्या भिंतीवर लिहिले होते, धर्म म्हणजे माणसावरती प्रेम करणे आहे. हा विचार वाचताना, ऐकताना आपल्याला खरेच धर्माबद्दलची जाणीव निर्माण होईल का? मुळातच ज्या वयामध्ये मुलांना धर्म म्हणजे काही माहीत नाही. धर्माचा विचार कशासाठी केला जातो हेही माहीत नाही. धर्माबद्दलच्या कोणत्याच संकल्पना मुलांच्या मनामध्ये रूजलेल्या नाहीत. जेथे धर्माचा विचार रूजवण्यासाठी स्वतंत्रपणे विचार केला जात नाहीत. अशा वेळेस धर्माविषयीचे सुविचार आपण लिहिले, तरी मुलांच्या मनामध्ये त्या संदर्भात प्रश्न पडतील का? आणि पडले तरी त्या वयाला अनुरूप अशा विचाराची दृष्टी देता येईल का? त्यामुळे या भिंती आपण केवळ सजवण्यासाठीच रंगवत आहोत का? त्यामुळे अशा सुवचनांचा शिक्षणाशी काही संबंध आहे असे चित्र नाही.

मुळातच शिक्षणाचा विचार करत असताना, शिक्षणाने माणूसपण जपण्याची आवश्यकता आहे. ते माणूसपण रुजवण्यामध्ये आपण प्रयत्न करण्याची गरज आहे. शिक्षणातून साक्षरता येते आहे. ते प्रमाण ९०- ९५ टक्क्यापर्यंत गेले आहेत, पण शिक्षणाने जीवनाला सार्थकता प्राप्त होईल असे काही आपण देतो आहोत की नाही? हा विषय अधिक महत्त्वाचा आहे. जीवनात सार्थकता प्राप्त होण्यासाठी चार भिंतीच्या आत आपण जे पेरतो आहोत, त्यातला अर्थ शोधण्याची कृती आपण निर्माण करण्यामध्ये अपयशी ठरत आहोत. आज वैद्यकीय शिक्षण घेतलेल्या मुलांना हल्ला करून जीवितहानी आणि राष्ट्राची आर्थिक हानी करावी अशा प्रकारचा विचार मनात येतोच कसा? हा खरा प्रश्न आहे. याचा सरळ अर्थ आहे, की आपल्या शिक्षणातून आपण अधिक मार्कांची माणसे निर्माण केली आहेत; मात्र आपण गुणवान माणसे निर्माण करण्यात अपयशी झालो आहोत. गुणवंत माणसे घडवण्यामध्ये अपयश येथे आहेत याचे कारण आमची संपूर्ण शिक्षण व्यवस्था मार्क केंद्रित झाली आहे. पालकांना, मुलांना शाळांना आणि शिक्षकांना देखील फक्त मार्क हवे आहेत. गुणवत्तेचा सध्या तरी सरळ एकच अर्थ आहे, तो म्हणजे अधिक मार्कांचे विद्यार्थी निर्माण करणे. शाळांची गुणवत्ता ही शेकडा मार्क, निकालावर बोलत असेल तर लोक त्यामागे धावणार हे निश्चित आहे.

**शिक्षणाचा विचार**

आज आपण शिक्षणासंदर्भात घेऊन विचार करतो, तेव्हा आम्ही माणूस घडवतो असा विचार केंद्रस्थानी ठेवून शाळा काम करताना दिसत नाहीत. शिक्षणाचे ध्येय, उद्दिष्ट यांचा विचार केंद्रस्थानी नाही. आपल्या केंद्रस्थानी उद्याच्या भविष्यासाठीचा अभ्यासक्रम निवडणे आणि त्यासाठी शाळांमधून रुजवण करणे एवढाच झाला आहे. अलीकडच्या कालखंडामध्ये मुलांमध्ये स्पर्धा परीक्षेचे वातावरण निर्माण करण्यात व्यवस्थेला चांगलेच यश आले आहे.

शाळांमध्ये सुद्धा स्पर्धात्मक वातावरण निर्माण केले जात आहे. ही स्पर्धा शैक्षणिक आनंददायी वातावरणापासून मुलांना विचारापासून दूर नेते आहे का? याचा विचार करण्याची आवश्यकता आहे. मुळातच उद्याच्या स्पर्धेसाठीची तयारी म्हणून आपण आजकाल शाळांपासून पेरणी करत आहोत. त्याचा किती सकारात्मक परिणाम होतो याचा विचार करण्याची आवश्यकता आहे. उद्या आपली मुले केंद्राच्या, राज्याच्या प्रशासकीय सेवांमध्ये यावीत म्हणून पहिली, दुसरीपासूनच आपण हा विचार करू लागलो, तर शिक्षणाचा मूलभूत हेतूच आपण हरवत आहोत का? याचा शोध घ्यायला हवा. त्याला सवय लागावी म्हणून आज आपण पेरणी करावी असे म्हणत असताना, आपण आज माणूस घडविण्यासाठी जो विचार करण्याची गरज आहे. मूलभूत स्वरूपाची साक्षरता, मूलभूत स्वरूपाचा शिक्षण विचार आणि शिक्षणाच्या अर्थपूर्णतेचा विचार शिक्षणातून पेरण्यासाठी त्याने जो विचार करायला हवा, त्या दिशेचा प्रवास आपण करणार, की नाही? हा खरा प्रश्न आहे.

**विकसित विचार प्रक्रिया**

मुळातच आज इतक्या लहान वयामध्ये स्पर्धा निर्माण केली, तर विद्यार्थी घडण्याची शक्यता नाहीत. ही स्पर्धा निर्माण करत असताना त्या मुलाला विचार करता यायला हवा. जोपर्यंत विचार करण्याची प्रक्रिया विकसित होत नाही, क्षमता तयार होत नाही. तोपर्यंत आपल्याला उत्तम दर्जाची माणसे निर्माण करता येणार नाहीत. जोवर आपण माणूस घडवत नाहीत तोपर्यंत शिक्षणाचा अर्थ जीवनात उतरण्याची शक्यता नाही. जीवनाची सार्थकता तेव्हाच येते, जेव्हा शब्दांना अर्थ असतो. शब्दांचा अर्थ हा शब्दकोशात अथवा पुस्तकात सापडत नाही. तो लिहिला गेला तरी तो अर्थ नसतो. तो केवळ शब्दाला दिलेला पर्याय असतो.

जीवनात शब्दांचे अर्थ शोधायचे असतील, तर जीवनातील अनुभवास अधिक महत्त्व आहे. त्या अनुभवाबद्दल आपले शिक्षण बोलत नाही. भिंतीवरच्या सुविचाराने मुलांच्या मनामध्ये खरेच धर्माचा खरा अर्थ रूजला जाईल का? मुलांनी सुविचार वाचल्यामुळे जीवनाची वाटचाल यशस्वीपणे चालता येईल का? या प्रकारच्या सुविचारामुळे आपण केवळ शब्दांचा फुलोरा पेरत आहोत. हा फुलोरा मुलांच्या अंत:करणांमध्ये रूजण्याची शक्यता नाही. हा रुजवला जात नाहीत तोपर्यंत शिक्षणातून उच्च पदवीधर निर्माण केले, तरी त्यांच्या मनामध्ये राष्ट्रप्रेम, समाज प्रेम, धर्म, संस्कृती याच्याबद्दलच्या आत्मीयतेची बीजेही सापडण्याची शक्यता नाही. त्यामुळे मुळातच शब्दाचे अर्थ जगण्यात शोधता यावेत आणि प्रत्येक मुलाला ते शोधण्यासाठी काही वेळ देण्याची गरज आहे.आज आपल्या शिक्षणामध्ये मार्क केंद्रित विचार असल्यामुळे, जीवनाला आनंदाने सामोरे जाण्यासाठीच्या दृष्टीने असे काहीही शिकण्यामध्ये दिसत नाही. असे चित्र असणार असेल, भविष्यातील आपल्याच मार्गामध्ये अधिक अडथळे निर्माण होण्याची शक्यता आहे. राष्ट्र प्रेमाची संकल्पना हळू दुरावते आहे. शिक्षणात मूल्यांचा विचार हरवत चालला आहे. शिक्षणातून मूल्यांच्या विचारांची पेरणीचा विचार निश्चित करायला हवा. असे वरवर आपण बोलत असलो आणि त्यासाठी सुविचाराच्या भिंती रंगवत असलो, तरी अशा भिंती रंगून आपल्याला फारसे काही साध्य करता येणार नाही. त्यामुळे आपल्याला शिक्षणातील जो विचार पेरायचा आहे, त्या प्रत्येक गोष्टीचा अधिक खोलवर जाऊन गंभीरपणे विचार करण्याची गरज आहे. तो विचार आपण किती आणि कसा करतो हे अधिक महत्त्वाचे आहे. त्यामुळे भिंतीचा विचार शिकण्याच्या, प्रेरणेच्या दिशेने करण्याची गरज आहे. अन्यथा शिक्षणाचा प्रवास सुरू राहील आणि पुन्हा पुन्हा विकृतीचे दर्शन घडणेही सुरू राहील. स्पर्धेपेक्षा आज माणूस म्हणून विचार करण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्टा करण्याची गरज आहे.

## डॉक्टर टीप्स

### बुद्धी तल्लख होण्यासाठी आपल्या आहारात करा हे पदार्थ समाविष्ट



अक्रोडामध्ये जीवनसत्वे, क्षार, मोनोअनसॅच्युरेटेड फॅटस मुबलक मात्रेमध्ये असल्याने याचे सेवन मेंदूच्या आरोग्याला पूरक आहे. अक्रोडाच्या नियमित सेवनाने स्मृतीभ्रंशासारखे विकार टाळता येऊ शकतात. मासे, कडधान्ये, आणि पालेभाज्यांमध्ये क्षार आणि जीवनसत्वे मोठ्या प्रमाणांत असल्याने यांच्या सेवानाने वार्धक्यकाळी उद्भवणारा स्मृतीभ्रंश टाळता येऊ शकतो. आयुर्वेदाच्या अनुसार ब्राह्मी ही औषधी मेंदूसाठी टॉनिकचे काम करते. त्यामुळे केसांना लावण्याच्या तेलामध्ये याचा वापरही बुद्धीवर्धनासाठी केला जाण्याची परंपरा प्राचीन काळापासून रूढ आहे.




## विनोद

अहो भिकुशेट, असे डोळे सारखे मिटून काय बसलात?'

'अहो, त्याचे असे आहे, बायकांनी उभे राहायचे नि आपण ऐसपैस बसायचे हे पाहवत नाही मला !'

## संदेश

**Kiya sunaye aap ko Dastan e gham Jab se tum mile preshan h hum.**

## सुविचार



निसर्गातील प्रत्येक वस्तूमध्ये काहीतरी आश्चर्यकारक आहे.


**- ॲरिस्टॉटल**

**संस्कृत सुभाषित**

**नित्य कुकर्म सर्वस्व फलत्यात्मनिसर्वदा।**
**यो यद्वपति बीनहि, लभते सोऽपि तत्फलम्॥**

**अर्थ** - जो कोणी कुकर्म करील म्हणजे दुराचरण करील, त्याचे फळ त्याला मिळाल्याशिवाय कदापि राहणार नाही. कारण जो जसे बी पेरील, तसेच फळ त्याला प्राप्त होईल.

# मनोरंजक महाशब्दकोडे



**आडवे शब्द**

१. श्रीरामाचा तेरा अक्षरी मत्र
१०. शर्त, पण
१२. फायदा, कल्याण
१३. जन्म
१४. माझे
१५. रमापती
१६. डग्याची साथीदार
१७. वाळा
१८. चांदणी
२०. सीतेला पळविणारा
२२. आवड, उत्कट इच्छा
२४. धातूचा धागा
२५. नरमच्या विरुद्ध
२७. भीमाजवळचे शस्त्र
२९. उथळ पाण्याचा आवाज
३०. नवरा (ग्रा.)
३१. 'रामचरित मानस' लिहिणारे
३३. कामदेव
३४. अंजन
३६. शहराचा भाग, पेठ, पूर्ण
३८. भारवाहक
३९. थंडावा
४०. सगळीकडे
४१. चलनवलन
४२. श्रीयुत
४४. व्यापारी फायदा
४६. पाप
४७. धाव, आघात
४९. वक्र
५२. आवरण
५४. कोवळ्या दुधाचा पदार्थ
५६. 'दिव्यावरील' अंधार!
५८. लिहिताना डावीकडे सोडलेली मोकळी जागा
५९. साखळी असलेला दिवा
६०. जंगला
६२. मैत्रीण
६३. निकट, जवळ
६५. गुल होणारा दिवा!
६६. समशेर
६९. उंटाच्या पाठीवरील उंचवटा
७०. कायदेशीर नसलेले
७२. स्त्री भूत
७३. नड, आवश्यकता
७४. डाकुंचा प्रमुख
७५. अंगरखा
७७. आंध्रमधून आलेली भटकी जमात
७८. नमस्कार
८१. झोपेचे खोबरे
८२. रात्रीचा पाऊस
८३. वस्तू निर्मितीची जागा

**उभे शब्द**

१. धनको, धनवान
२. बाई, स्त्री
३.सांगलीतील पूर्वीचे संस्थान
४. सुकुमार
५. अंत:करण
७. बस्तान
८. मृत्यूचा राजा
९. मृत्यू
१०. सेपे नसलेले
११. चेष्टा
१७. अफूचे बीज
१९. संतापी
२१. आशीर्वाद
२३. मायेची सावली
२५. मनोरंजन करणारा
२६. भालप्रदेश
२७. विटी-दांडूचा खड्डा
२८. विदुराला हिणवताना वापरले गेलेले संबोधन
३१. मंजिऱ्यांचे रोपटे
३२. बायको (सं.)
३३. स्निग्ध औषध
३५. भारतीय सैनिक
३७. भविष्यकथनासाठी उपयोगी मानला जाणारा मणी
३८. मिठाईचा एक प्रकार
३९. गाणे म्हणणारा
४१. हस्तलाघव
४३. काहीजणांसाठी हे निद्रासन ठरते!
४५. बरगडी
४६. चौथा हिस्सा
४८. पहारेकरी
५०. दरोडा
५१. चर्चा, विचारविनिमय
५२. सत्व, ताकद
५३. अजून, जास्त
५५. वर-वधूची मिरवणूक
५७. जिम्मेदार
६१. समीक्षक
६२. रंग बदलणारा प्राणी
६४. गरजू, अडलेला
६७. मध्यस्थ
६८. फुकाची पायपीट
६९. सुसर
७०. हरभरा डाळीचे पीठ
७१. जेव्हा
७५. मैत्री
७६. सर्वसत्ताधीश, भूपती
७९. औषध
८०. संगीतातील पलटे

**आडवे उत्तर**

१.श्रीराम जयराम जयजयराम
२.अट १२.हित १३.जनन
१४.मम १५.रमावर १६.तबला
१७.खस १८.तारा २०.रावण
२२.हौस २४.जर २५.कडक २७.गदा
२९.खळखळाट ३०.दादला
३१.तुलसीदास ३३.मदन
३४.काजळ ३६.पुरा ३८.हमाल
३९.गारवा ४०.सर्वत्र ४१.हालचाल
४२.महाशय ४४.नफा ४६.पातक
४७.वार ४९.वाकडा ५२.कवच
५४.खरवस ५६.काजळी
५८.कडप्पा ५९.लामणदिवा
६०.रानटी ६२.सखी ६३.लगत
६५.बत्ती ६६.तलवार ६९.मदार
७०.बेकायदा ७२.डाकीण
७३.गरज ७४.सरदार ७५.सदरा
७७.रबर ७८.वंदन ८१.जागरण
८२.रातवा ८३.कारखाना

**उभे उत्तर**

१.श्रीमंत २.महिला ३.जत
४.राजस ५.मन ६.जनता ७.जम
८.यमराज ९.मरण १०.अवघड
११.टर १७.खसखस १९.रागीट
२१.वरदान २३.पाखर
२५.कलाकार २६.कमळ
२७.गल २८.दासीपुत्र ३१.तुळस
३२.दारा ३३.मलम
३५.जवान ३७.लोलक ३८.हलवा
३९.गायक ४१.हातचलाखी ४३.शवासन ४५.फासळी ४६.पाव ४८.रखवालदार ५०.डाका ५१.चाकवत ५२.कप्पा
५३.आणखी ५५.वरात ५७.जबाबदार
६१.टीकाकार ६२.सरडा ६४.गरजवंत
६७.लवाद ६८.रणरण ६९.मगर ७०.बेसन
७१.यदा ७५.सख्य ७६.राजा ७९.दवा
८०.ताना



# क्रीडा विश्व



## थोडक्यात/ संक्षिप्त

### भारत - पाकिस्तान सामना होणार नाही पण....

**दिल्ली**–आयसीसीकडून पुरुष अंडर–१९ वर्ल्ड कप २०२६ चे आयोजन करण्यात आलं आहे. पुढील वर्षी जानेवारी आणि फेब्रुवारी महिन्यात या स्पर्धेचं आयोजन नामीबिया आणि झिम्बाब्वे या दोन देशांमध्ये होणार आहे. यासाठी आयसीसीने शेड्युल जाहीर केलं आहे. या स्पर्धेत एकूण १६ संघ सहभागी होणार असून त्यांना चार ग्रुपमध्ये विभागण्यात आलं आहे. अधिकतर भारत – पाकिस्तान चे संघ एकाच ग्रुपमध्ये दिसतात पण या स्पर्धेसाठी त्यांना वेगवेगळ्या ग्रुपमध्ये टाकण्यात आलं आहे.

ग्रुप स्टेजमध्ये भिडणार नाही : काही महिन्यांपूर्वी आशिया कप २०२५ मध्ये भारत – पाकिस्तान यांच्यात तीन सामने झाले होते. फायनल सामना सुद्धा भारत – पाकिस्तान यांच्यात खेळवला गेला होता. मात्र नो हॅन्डशेक, ट्रॉफी न मिळणे इत्यादी अनेक कंट्रोवर्सी झाल्या. त्यामुळे आता आयसीसीने निर्णय घेतला की भारत – पाकिस्तान यांना एका ग्रुप स्टेज सामन्यात खेळणार नाही. अंडर–१९ वर्ल्ड कप १५ जानेवारी ते ६ फेब्रुवारीपर्यंत होणार आहे. भारताचे सर्व ग्रुप फेरीचे सामने झिम्बाब्वेच्या बुलावायो येथील क्वीन्स स्पोर्ट्स क्लबमध्ये खेळवले जातील.

### पुन्हा एकदा १९ नोव्हेंबर... रोहित शर्माचा परत हार्टब्रेक

मुंबई–१९ नोव्हेंबर २०२३ हा दिवस कोणताही भारतीय क्रिकेट चाहता कधीही विसरू शकत नाही. वनडे वर्ल्ड कपच्या फायनलमध्ये ऑस्ट्रेलियाने भारताला पराभवाचा धक्का दिला, या पराभवानंतर कर्णधार रोहित शर्मा, विराट कोहलीसह टीम इंडियाच्या सर्व खेळाडूंचे मैदानातच अश्रू अनावर झाले. टीम इंडियाच्या खेळाडूंसोबतच भारतीय क्रिकेट चाहत्यांच्याही डोळ्यातून पाणी आलं. असंख्य भारतीय क्रिकेट चाहत्यांसाठी १९ नोव्हेंबर हा काळा दिवस वाटतो.पुन्हा एकदा १९ नोव्हेंबरलाच रोहित शर्माचा हार्टब्रेक झाला आहे. आयसीसीने १९ नोव्हेंबरच्या दिवशी केलेल्या एका घोषणेमुळे रोहितसोबतच असंख्य भारतीय क्रिकेट चाहतेही नाराज झाले आहेत. रोहित शर्मा आता वनडे क्रिकेटमध्ये नंबर वन बॅटर राहिलेला नाही. न्यूझीलंडच्या डॅरेल मिचेलने रोहित शर्माची नंबर वनची खूर्ची काढून घेतली आहे.वेस्ट इंडिजविरुद्धच्या वनडे सीरिजमध्ये धमाकेदार बॅटिंग केल्यानंतर डॅरेल मिचेल वनडे क्रिकेटचा नवा नंबर वन बॅटर बनला आहे, याचसोबत त्याने इतिहासही घडवला आहे.

### विराट-रोहितलाही जमले नाही, ते या पठ्ठ्याने केले

मुंबई–न्यूझीलंडने वेस्ट इंडिजला दुसऱ्या वनडेमध्ये ५ विकेटने पराभूत केलं आणि सीरिजमध्येही विजय मिळवला. ३ वनडे मॅचच्या या सीरिजमध्ये किवी टीमने २–० ने विजयी आघाडी मिळवली आहे. वेस्ट इंडिजचा या सीरिजमध्ये पराभव झाला असला तरी त्यांचा कर्णधार शाय होपसाठी हा सामना कायमच आठवणीत राहिल असा ठरला. होपने या सामन्यात फक्त शतकच केलं नाही, तर रोहित शर्मा आणि विराट कोहलीलाही जो विक्रम करता आला नाही, त्याला शाय होपने गवसणी घातली आहे. असा विक्रम करणारा होप हा जगातला पहिला क्रिकेटपटू बनला आहे.शाय होप आयसीसीच्या सगळ्या फूल मेंबर्स टीमविरुद्ध आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये शतक करणारा जगातला पहिला खेळाडू बनला आहे. होपने सगळ्या ११ फुल मेंबर देशांविरुद्ध आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये शतक ठोकलं आहे. याआधी कोणत्याही खेळाडूला अशी कामगिरी करता आली नाही. होपने भारत, इंग्लंड, बांगलादेश, पाकिस्तान, श्रीलंका, झिम्बाब्वे, दक्षिण आफ्रिका, अफगाणिस्तान, आयर्लंड, न्यूझीलंड आणि ऑस्ट्रेलियाविरुद्ध शतकं केली आहेत.

### आर्यवीर सेहवागकडून गोलंदाजांची धुलाई

मुंबई : भारतीय संघाचा माजी सलामीवीर वीरेंद्र सेहवाग हा गोलंदाजांसाठी कर्दनकाळ मानला जात असे. सेहवाग पहिल्याच षटकापासून गोलंदाजांची धुलाई करायचा. गोलंदाज त्याला गोलंदाजी करायलाही घाबरत असत. सेहवागने आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये खूप धावा केल्या आणि तडाखेबाज फलंदाज अशी वेगळी ओळख निर्माण केली. त्याचा मुलगा आर्यवीर सेहवाग देखील वडिलांप्रमाणेच गोलंदाजांसाठी डोकेदुखी बनला आहे. कूच बिहार ट्रॉफीमध्ये त्याने गोलंदाजांना अक्षरश: सळो की पळो करून सोडले आणि संघाच्या विजयात महत्त्वाची भूमिका बजावली.कूचबिहार ट्रॉफीमध्ये आर्यवीर सेहवागने अद्भुत कामगिरी केली. २०२५चा कूचबिहार ट्रॉफी सामना दिल्ली आणि बिहार यांच्यात पालम येथील एअर फोर्स कॉम्प्लेक्स ग्राउंडवर खेळवण्यात आला. या सामन्यात आर्यवीर सेहवागने आपल्या फलंदाजीचे कौशल्य दाखवले.

# शे होपचं न्यूझीलंडविरुद्ध ऐतिहासिक वादळी शतक!

## ब्रायन लाराचा विक्रम मोडला, वेस्ट इंडिजसाठी अशी कामगिरी करणारा





**नवी दिल्ली:** वेस्ट इंडिजचा वनडे कर्णधार शे होपने न्यूझीलंडविरूद्ध सामन्यात शतकी खेळी केली. यासह त्याने मोठा विक्रम आपल्या नावे केला. न्यूझीलंड आणि वेस्ट इंडिज यांच्यात वनडे मालिका खेळवली जात आहे. या मालिकेतील दुसऱ्या सामन्यात वेस्ट इंडिजचा कर्णधार शे होपने वादळी शतकी खेळी केली आहे. होपने अवघ्या ६६ चेंडूत आपलं शतक पूर्ण केलं. होपच्या शतकातील सर्वात उल्लेखनीय गोष्ट म्हणजे त्याने कठीण परिस्थितीत फलंदाजीला येत संघाचा डाव सावरत शतकी खेळी केली. यादरम्यान त्याने दिग्गज ब्रायन लाराचा विक्रम मोडला आहे. शे होपचं हे १९ वे एकदिवसीय शतक होतं. होपच्या उत्कृष्ट खेळीमुळेच वेस्ट इंडिजने ३४ षटकांत २४७ धावांचा पल्ला गाठला. शे होपने ६९ चेंडूत १३ चौकार व ४ षटकारांसह १०९ धावांची उत्कृष्ट केळी केली. याशिवाय कोणताच फलंदाज ३० धावांचा टप्पा पार करू शकला नाही.

न्यूझीलंडविरुद्ध वेस्ट इंडिजची सुरुवात खराब झाली. संघाने ४० धावांच्या आत दोन विकेट गमावल्या आणि ८६ धावांपर्यंत पोहोचताच निम्मा संघ पॅव्हेलियनमध्ये परतला होता. दुसऱ्या टोकाला उभे राहून, शे होपने आपल्या संघाला संघर्ष करताना पाहून खेळपट्टीवर पाय घट्ट रोवून उभा होता. यादरम्यान त्याने उत्कृष्ट फलंदाजी करत न्यूझीलंड संघाविरूद्ध वनडेमधील त्याचं पहिलं शतक झळकावलं.

**वेस्ट इंडिजसाठी सर्वात जलद ६ हजार धावा करणारा दुसरा फलंदाज**

शे होपने या शतकी खेळीसह मोठा विक्रम ही आपल्या नावे केला आहे. शे होप हा वेस्ट इंडिजसाठी सर्वात जलद ६ हजार वनडे धावा करणारा दुसरा फलंदाज ठरला आहे. शे होपने १४२ डावांमध्ये ६ हजार धावा करण्याचा विक्रम केला आहे. यासह होपने ब्रायन लाराचा विक्रम मोडला आहे. ब्रायन लारा यांनी १५५ डावांमध्ये ६ हजार धावांचा टप्पा गाठला आहे.

**वेस्ट इंडिजसाठी सर्वात जलद ६ हजार वनडे धावा करणारे फलंदाज**

विव्हियन रिचर्ड्स – १४१ डाव
शे होप – १४२ डाव
ब्रायन लारा – १५५ डाव
डी हेन्स – १६२ डाव
ख्रिस गेल – १६६

### तब्येतीमध्ये सुधारणा, मात्र दुसरा सामना खेळणार का?



कोलकाता: कोलकातामधील ईडन गार्डन्सवर झालेल्या दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या पहिल्या कसोटी सामन्यादरम्यान भारतीय कर्णधार शुभमन गिलच्या मानेला दुखापत झाली होती. त्यामुळे तो कसोटीच्या पहिल्या सामन्यात फारसा दिसला नाही. सामना झाल्यानंतर शुभमनला रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. जिथून त्याला दाखल केल्याच्या दुसऱ्या दिवशी डिस्चार्ज मिळाला. बीसीसीआयने याबाबत ट्विटद्वारे माहिती दिली आहे.

बीसीसीआयने ट्विटमध्ये सांगितले की, शुभमन वैद्यकीय उपचारांना चांगला प्रतिसाद देत आहे. दुसऱ्या कसोटी सामन्यासाठी तो १९ नोव्हेंबरला संपूर्ण संघासोबत गुवाहाटीला जाणार आहे. बीसीसीआयच्या वैद्यकीय पथकाकडून त्याच्यावर सतत देखरेख ठेवली जात असून उपचारांनुसार दुसऱ्या कसोटीतील त्याच्या सहभागाबाबत निर्णय घेतला जाईल. यामुळे शुभमन दुसऱ्या कसोटीमध्ये दिसणार की नाही? हा प्रश्न उपस्थित झाला आहे.दुसरा महत्त्वाचा प्रश्न म्हणजे, जर शुभमन गिल खेळला नाही तर त्याची जागा कोण घेणार? कोलकातातील ईडन गार्डन्सवर झालेल्या पराभवानंतर टीम इंडियाने जोरदार सरावाला सुरूवात केली आहे. ज्यात साई सुदर्शनने सराव करताना घाम गाळला आणि गिलच्या जागी या खेळाडूला संधी मिळण्याची शक्यता दिसली. मात्र आता गौतम गंभीर काय निर्णय घेतात हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

# भारताचा आशिया कप रायझिंग स्टार्सच्या उपांत्य फेरीत प्रवेश



दोहा : भारताने आपला दुसरा सामना जिंकून आशिया कप रायझिंग स्टार्सच्या उपांत्य फेरीत प्रवेश केला. दोहा स्टेडियमवर झालेल्या सामन्यात संघाने ओमानचा सहा विकेट्सने पराभव केला. हर्ष दुबेने नाबाद अर्धशतक झळकावले आणि एक विकेट घेतली.

भारत अ संघाचा कर्णधार जितेश शर्माने नाणेफेक जिंकून गोलंदाजीचा निर्णय घेतला. प्रथम फलंदाजी करताना ओमानने २० षटकांत ७ गडी गमावून १३५ धावा केल्या. वसीम अलीने सर्वाधिक नाबाद ५४ धावा केल्या. भारताकडून गुर्जपनीत सिंग आणि सुयश शर्मा यांनी प्रत्येकी २ गडी बाद केले. १३६ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना, भारत अ संघाने १७.५ षटकांत ४ गडी गमावून लक्ष्य गाठले. संघाकडून हर्ष दुबेने नाबाद ५३ धावा केल्या. आर्यन बिष्टने एक विकेट घेतली.प्रथम फलंदाजी करताना ओमानच्या सलामीवीरांनी पहिल्या विकेटसाठी चार षटकांत ३७ धावा जोडल्या. ओमानकडून दुसरी विकेट गमावल्यानंतर फलंदाजीला आलेल्या वसीम अलीने शानदार फलंदाजी केली. त्याने ४५ चेंडूत ५४ धावा करत आपला पहिला टी–२० अर्धशतक झळकावला. अलीने १२० च्या स्ट्राईक रेटने खेळ करत पाच चौकार आणि एक षटकार मारला. भारताकडून गुर्जपनीत सिंग आणि सुयश शर्मा यांनी प्रत्येकी दोन बळी घेतले. हर्ष दुबे, विजयकुमार वैशाख आणि नमन धीर यांनी प्रत्येकी एक बळी घेतला. मागील दोन सामन्यांमध्ये भारतासाठी शानदार फलंदाजी करणारा वैभव सूर्यवंशी १३ चेंडूत १२ धावा करून बाद झाला. आर्यन बिष्टने त्याला झेलबाद केले. सलामीवीर प्रियांश आर्य देखील फारशी कामगिरी करू शकला नाही. तो ६ चेंडूत १० धावा करून बाद झाला. त्याने दोन चौकारही मारले. शफीक जैनच्या चेंडूवर मुजहिर रझाने प्रियांशला झेलबाद केले. पहिल्या विकेटनंतर फलंदाजीला येत असताना, नमन धीरने मैदानावर सर्वत्र फटकेबाजी केली. त्याने १९ चेंडूत ३० धावा केल्या, ज्यात दोन चौकार आणि दोन षटकारांचा समावेश होता. नमनला समय श्रीवास्तवने बाद केले.

हर्ष–नेहलची भागीदारी : नमन बाद झाल्यानंतर, संघाने अष्टपैलू हर्ष दुबेला फलंदाजीच्या क्रमावर बढती दिली. हर्षने नेहल वधेरासोबत चौथ्या विकेटसाठी ५२ चेंडूत ६६ धावांची भागीदारी केली आणि भारताचा विजय निश्चित केला. हर्षने शानदार फलंदाजी करत ४४ चेंडूत ५३ धावा केल्या. १२०.४५ च्या स्ट्राईक रेटने खेळताना हर्षने डावात सात चौकार आणि एक षटकारही मारला. २४ चेंडूत २३ धावा काढून वधेरा पॅव्हेलियनमध्ये परतला. त्याने डावात एक षटकारही मारला. नेहलला आर्यन बिष्टने बाद केले. त्यानंतर फलंदाजीसाठी आलेल्या कर्णधार जितेश शर्माने आर्यन बिशतच्या चेंडूवर चौकार मारून सामना जिंकून दिला. ओमानकडून जय ओडेदरा, शफीक जैन, समय श्रीवास्तव आणि आर्यन बिश्त यांनी प्रत्येकी एक बळी घेतला.

# रोहित शर्माकडून हिसकावले आयसीसी वनडे क्रमवारीतील पहिले स्थान

## ४६ वर्षांत पहिल्यांदाच या संघाचा खेळाडू ठरला नंबर वन



दिल्ली–भारतीय संघाचा माजी कर्णधार व मुंबईचा राजा अशी ओळख असलेल्या रोहित शर्माने टी–२०, कसोटीत निवृत्तीनंतर वनडे मालिकेत दणक्यात पुनरागमन केलं होतं. ऑस्ट्रेलियाविरूद्ध वनडे मालिकेत रोहित शर्माने सर्वाधिक धावा करत मालिकावीर होण्याचा मान मिळवला. या मालिकेनंतर आयसीसी क्रमवारीत रोहित शर्मा वनडेमधील अव्वल फलंदाज ठरला. पण आता पुढील मालिकेपूर्वी रोहित शर्माने आपले पहिले स्थान गमावले आहे.

रोहित शर्माने तीन आठवड्यांनी एकदिवसीय क्रिकेटमधील नंबर १ स्थान गमावल आहे. आयसीसीच्या ताज्या एकदिवसीय क्रमवारीत रोहित शर्मा पहिल्या स्थानावरून दुसऱ्या स्थानी घसरला आहे. तर रोहित शर्माशिवाय शुबमन गिल व विराट कोहली अनुक्रमे चौथ्या व पाचव्या स्थानी कायम आहेत.

आयसीसी वनडे क्रमवारीत रोहित शर्माच्या जागी पहिल्या स्थानी न्यूझीलंडचा मधल्या फळीतील फलंदाज डॅरिल मिचेलने स्थान मिळवलं आहे. डॅरिल मिशेलने ७८२ रेटिंग गुणांसह पहिलं स्थान मिळवलं आहे. रोहित शर्मा त्याच्यापेक्षा फक्त एक गुणाने मागे आहे. डॅरिल मिचेल यापूर्वी तिसऱ्या क्रमांकावर होता. मिचेल रोहित व इब्राहिम झादरानला मागे टाकत पहिले स्थान गाठले. ४७ वर्षांनंतर, न्यूझीलंडचा फलंदाज पहिल्यांदाच वनडे क्रमवारीत पहिल्या स्थानी पोहोचला आहे. यापूर्वी ग्लेन टर्नर १९७९ मध्ये अव्वल वनडे फलंदाज बनला होता आणि आता डॅरिल मिचेलने ही कामगिरी केली आहे. डॅरिल मिचेल हा न्यूझीलंडचा खेळाडू आहे जो तिन्ही फॉरमॅटमध्ये खेळला आहे. या खेळाडूने ३३ सामन्यांमध्ये ४४ पेक्षा जास्त सरासरीने २१३९ धावा केल्या आहेत. एकदिवसीय सामन्यांमध्ये त्याने ५३.१३ च्या सरासरीने २३३८ धावा केल्या आहेत. मिचेलने एकदिवसीय सामन्यांमध्ये सात शतके केली आहेत.

डॅरिल मिचेलने २०२५ मध्ये वनडेत उत्कृष्ट कामगिरी केली आहे. त्याने या वर्षी १६ डावांमध्ये ५४.३५ च्या सरासरीने ७६१ धावा केल्या आहेत. यादरम्यान त्याने एक शतक आणि सहा अर्धशतकं केली आहेत. रोहित शर्माला पुन्हा एकदा नंबर वन वनडे फलंदाज बनण्याची संधी आहे. ३० नोव्हेंबरपासून दक्षिण आफ्रिकेविरुद्ध सुरू होणाऱ्या एकदिवसीय मालिकेत हिटमॅन खेळताना दिसणार आहे. रोहितने तिन्ही सामन्यांमध्ये चांगली कामगिरी केली तर डॅरिल मिचेलला मागे टाकत तो पुन्हा अव्वल स्थानी पोहोचू शकतो.

# गुवाहाटीत पहिल्यांदाच होणार भारत आणि दक्षिण आफ्रिका कसोटी सामना!

गुहावटी–भारतीय संघाला पहिल्या कसोटी सामन्यात दक्षिण आफ्रिकेकडून हार पत्कारावी लागली. फिरकीपटूंसाठी फायदेशीर असलेल्या कोलकातातील इडन गार्डन या खेळपट्टीवर टीम इंडियाची खेळी कमी पडली. मात्र आता भारतीय संघाला ही मालिका गमावायची नसेल तर कोणत्याही स्थितीत दुसरा कसोटी सामना जिंकावाच लागणार आहे. भारताचा दक्षिण आफ्रिकेविरूद्धचा दुसरा कसोटी सामना गुहावटीमध्ये होणार आहे.

भारतीय संघाचा दक्षिण आफ्रिकेविरूद्धचा दुसरा आणि अंतिम सामना २२ नोव्हेंबरपासून सुरू होणार आहे. दुसरा कसोटी सामना गुवाहाटीत होणार असून पहिल्या सामन्यापेक्षा काही मिनिटं आधी दुर्सया सामन्याला सुरुवात होणार आहे. कोलकातात पहिल्या कसोटी सामन्याला सकाळी ९ वाजून ३० मिनिटांनी सुरुवात झाली होती. मात्र कोलकाताच्या तुलनेत गुवाहाटीत ३० मिनिटांआधी नाणेफेक आणि सामना सुरु होणार आहे. या पार्श्वभूमीवर अंदाजे ९ वाजता सामना सुरु होणार आहे. तर त्याआधी ८ वाजून ३० मिनिटांनी टॉस होईल.

कसोटी सामन्यांमध्ये आतापर्यंत आधी लंच ब्रेक आणि नंतर टी ब्रेक होतो. मात्र गुवाहाटीत यंदा ही परंपरा बदलणार असून आधी टी ब्रेक आणि नंतर लंच ब्रेक होणार आहे. कसोटी सामन्यांच्या इतिहासात लंचआधी टी ब्रेक होण्याची ही पहिलीच वेळ ठरणार आहे. महत्त्वाची गोष्ट म्हणजे गुवाहाटीत पहिल्यांदाच कसोटी सामना होणार आहे. त्यामुळे चाहते गुवाहाटीतील पहिल्या कसोटी सामन्यासाठी सज्ज आहेत.

### दक्षिण आफ्रिकेच्या पराभवासाठी काय असणार भारताची रणनीती ?



भारतीय संघावर पहिल्या सामन्यातील पराभवामुळे जोरदार टीका करण्यात आली. त्यामुळे आता भारतीय संघ कसोटीचा दुसरा सामना जिंकून दक्षिण आफ्रिकेसोबत बरोबरीचा हिशोब करण्यासाठी मैदानात उतरणार असल्याची चर्चा आहे. त्यामुळे पहिल्या पराभवानंतर भारतीय संघ या सामन्यात कोणत्या रणनितीने मैदानात उतरते? याची उत्सूकता क्रिकेट चाहत्यांना लागून आहे.

# २१ दिवसात २ वेळा तुटला युवराजचा महारेकॉर्ड, २ खेळाडूंनी ठोकल्या १६ सिक्स



मुंबई–क्रिकेटच्या मैदानात असे अनेक विक्रम बनले जे काही काळानंतर मोडले गेले, असंच एक रेकॉर्ड युवराज सिंगच्या नावावर आहे. पहिल्याच टी–२० वर्ल्ड कपमध्ये युवराजने १२ बॉलमध्ये ५० रन करून इतिहास घडवला होता. या सामन्यात युवराजने इंग्लंडचा फास्ट बॉलर स्टुअर्ट ब्रॉडला एका ओव्हरमध्ये ६ सिक्स मारले होते. युवराजचं हे रेकॉर्ड तब्बल दीड दशक कायम राहिलं, पण एक वेळ अशी आली की २१ दिवसांमध्येच हे रेकॉर्ड मोडलं गेलं.

नेपाळचा बॅटर दीपेंद्र सिंह याने २७ सप्टेंबर २०२३ ला मंगोलियाविरुद्ध टी–२० आंतरराष्ट्रीय सामन्यात ९ बॉलमध्ये अर्धशतक करून युवराजचं रेकॉर्ड मोडलं. यानंतर त्याच वर्षी १७ ऑक्टोबरला भारताच्या आशुतोष सिंगने सय्यद मुश्ताक अली टी–२० ट्रॉफीमध्ये ११ बॉलमध्ये अर्धशतक ठोकलं. दीपेंद्र आणि आशुतोष यांनी मिळून त्यांच्या ऐतिहासिक इनिंगमध्ये एकूण १६ सिक्स मारल्या, ज्या युवराजपेक्षा जास्त होत्या. या दोघांनी २२ बॉलमध्ये तब्बल १०५ रन काढले.

## ५०० च्या स्ट्राईक रेटने वादळ आले!

दीपेंद्र सिंगने एशियन गेम्स २०२३ मध्ये नेपाळकडून खेळताना मंगोलियाविरुद्ध पाचव्या क्रमांकावर बॅटिंगला उतरून १० बॉलमध्ये ५२ रनची खेळी केली. ९ बॉलमध्ये अर्धशतक करून दीपेंद्र सिंगने युवराजचं १६ वर्ष अबाधित राहिलेलं रेकॉर्ड मोडलं. दीपेंद्रने ५२० च्या स्ट्राईक रेटने हे रन केले, ज्यात ६ सिक्स आणि ६ फोरचा समावेश होता. ही विश्वविक्रमी खेळी करून दीपेंद्र नॉटआऊट पॅव्हेलियनमध्ये आला.

या सामन्यात नेपाळने २० ओव्हरमध्ये ३ विकेट गमावून ३१४ रन केले. या आव्हानाचा पाठलाग करताना मंगोलियाला फक्त ४१ रन करता आल्या. दीपेंद्रने त्याच्या टी–२० आंतरराष्ट्रीय करिअरमध्ये ९० सामन्यांमध्ये १३९.११ च्या स्ट्राईक रेटने १९५६ रन केले, ज्यात एक शतक आणि १० अर्धशतकांचा समावेश आहे.

भारताच्या आशुतोष शर्माने सय्यद मुश्ताक अली टी–२० ट्रॉफीमध्ये १२ बॉलमध्ये नाबाद ५३ रन करून धमाका केला. आशुतोषने अरुणाचल प्रदेशविरुद्ध ही वादळी खेळी केली. आशुतोष बॅटिंगला आला तेव्हा ५ ओव्हरचा खेळ शिल्लक होता, यानंतर त्याने ८ सिक्स आणि एक फोरच्या मदतीने युवराजचं रेकॉर्ड उद्ध्वस्त केलं. आशुतोषने बाऊंड्री मारूनच ५२ रन केले, ज्यात त्याचा स्ट्राईक रेट ४४२ होता. आशुतोषच्या या वादळी खेळीमुळे रेल्वेने २० ओव्हरमध्ये ५ विकेट गमावून २४६ रन केले. रेल्वेचा कर्णधार उपेंद्र यादवने ५१ बॉलमध्ये नाबाद १०३ रनची खेळी केली, ज्यात ९ सिक्स आणि ६ फोरचा समावेश होता. या आव्हानाचा पाठलाग करताना अरुणाचल प्रदेशचा १८.१ ओव्हरमध्ये ११९ रनवर ऑलआऊट झाला, त्यामुळे रेल्वेचा १२७ रननी विजय झाला. आशुतोषने त्याच्या टी–२० करिअरमध्ये ४७ सामन्यांमध्ये ९७६ रन केले, ज्यात ८ अर्धशतके आहेत.

## रक्तदान हेच महादान-डॉ.महेश शिंदे




**लातूर/प्रतिनिधी :**लातूर येथील प्रसिध्द मोरया क्रिटीकेअर हॉस्पीटलचे प्रमुख डॉ.महेश शिंदे यांचा ३८ वा वाढदिवस रक्तदान व अन्नदान करून उत्साहात साजरा करण्यात आला. मोरया क्रिटीकेअर हॉस्पीटल व संजीवनी ब्लड बॅक यांच्या संयुक्त विदयामाने साजरा करण्यात आलेल्या डॉ.शिंदे यांच्या जन्मदिनानिमीत ३० जणांनी रक्तदान केले. त्याच बरोबर शासकीय वैदयकीय महाविदयालय येथे गरजू पेशंटना अन्नदान करण्यात आले. याप्रसंगी आपले मनोगत व्यक्त करताना डॉ.शिंदे म्हणाले की,गरजू लोकापर्यत डॉक्टरचे जाणे गरजेचे असुन त्यांच्या अडचणी जाणुन घेतल्या पाहिजेत.

भावी काळात गरजु व्यक्तींना व्यक्तीगत पातळीवर जी मदत लागेल ती मी उपल्बध करून देणार आहे असे प्रतिपादन केले. तसेच आजपर्यंत च्या वाटचालीत सोबत असलेले डॉक्टर ,कर्मचारी यांचे त्यांनी आभार व्यक्त केले.

## पालक व ज्येष्ठ नागरीकांचे पालन पोषण व कल्याण कायद्याविषयी मार्गदर्शन



**लातूर/प्रतिनिधी :** केंद्र सरकारचा समाज कल्याण व सक्षमीकरण विभाग व महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण यांच्या सूचनेनुसार पालक व ज्येष्ठ नागरीकांचे पालन पोषण व कल्याण कायदा २००७ या विषयी जनजागृती करण्यासाठी लातूर जिल्हा विधी सेवा प्राधिकरण आणि लातूर उपविभागीय कार्यालयाच्यावतीने मातोश्री वृद्धाश्रम येथे विशेष शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. जिल्हा विधी सेवा प्राधिकरणचे अध्यक्ष संजय भारूका यांचे मार्गदर्शनाखाली झालेल्या जनजागृती शिबिरामध्ये जिल्हा विधी सेवा प्राधिकरणचे सचिव व्यंकटेश गिरवलकर, उपविभागीय अधिकारी रोहिणी नऱ्हे-विरोळे, मातोश्री वृद्धाश्रमाचे अध्यक्ष डॉ. महेश देवधर तसेच ज्येष्ठ नागरिक संघाचे संघटक डॉ. बी. आर. पाटील यांनी मार्गदर्शन केले.



नायब तहसीलदार परमेश्र्वर कांबळे, मंडळ अधिकारी आर. के. झाडे, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण लातूर चे कर्मचारी व मातोश्री वृद्धाश्रमातील सर्व ज्येष्ठ नागरिक यावेळी उपस्थित होते.

'वसुधैव कुटुंबकम'चा संदेश देणाऱ्या आपल्या देशात वृद्धाश्रमांची स्थापना होणे, ही खेदाची बाब आहे. घरातील आजी-आजोबा हे घराचा वारसा असतात. त्यामुळे घराण्याचा वारसा जपणे, घरातील प्रत्येक सदस्याची जबाबदारी आहे, असे जिल्हा विधी सेवा प्राधिकरणचे सदस्य सचिव व्यंकटेश गिरवलकर यांनी सांगितले. ज्येष्ठ नागरीकांची यादी पोलीस अधिक्षक कार्यालयात असणे गरजेचे आहे. तसेच ज्येष्ठ नागरीकांच्या तक्रारीचे निरासरण होण्यासाठी पोलीस अधिक्षक कार्यालयात हेल्पलाईन नंबर उपलब्ध करून देण्यात आला असून ज्येष्ठ नागरिकांनी यामुळे मदत होईल, असे त्यांनी सांगितले.

प्रत्येक मनुष्य हा वयाची साठी ओलांडलेवर ज्येष्ठ नागरीक बनत असतो. त्यामुळे त्याची जाणीव ठेवून घरातील सर्व ज्येष्ठ नागरीकांची काळजी व हीत जपणे सर्वांची जबाबदारी आहे, असे उपविभागीय अधिकारी रोहिणी नऱ्हे-विरोळे यांनी सांगितले. तसेच पालक व ज्येष्ठ नागरिकांचे पालन पोषण व कल्याण कायदा २००७ व महाराष्ट्र पालक व ज्येष्ठ नागरिकांचे पालन पोषण व कल्याण नियम २०१० मधील तरतुदींबाबत सविस्तर माहिती दिली.

# बालसंशोधक अरजित मोरेंच्या वैज्ञानिक दृष्टीला संवादाची जोड

## एनसीएलचे संचालक डॉ. आशिष लेले; 'जिज्ञासा' पुस्तकाचे प्रकाशन

**लातूर/प्रतिनिधी** 'भारताला २०४७पर्यंत एक विकसित देश बनविण्याचे केंद्र सरकारचे उद्दिष्ट आणि सर्वच देशवासीयांचे स्वप्न आहे. ही स्वप्नपूर्ती विज्ञान व तंत्रज्ञानाच्या लोकसंवादाशिवाय साध्य होणार नाही. बाल संशोधक अरजित मोरे याने 'जिज्ञासा' पुस्तकातून वैज्ञानिक दृष्टीला संवादाची जोड दिली आहे. त्यातून शालेय विद्यार्थ्यांना प्रेरणा मिळेल' असे मत वैज्ञानिक आणि औद्योगिक संशोधन परिषदेच्या (सीएसआयआर) राष्ट्रीय रासायनिक प्रयोगशाळेचे (एनसीएल) संचालक डॉ. आशिष लेले यांनी बुधवारी (दि. १९) व्यक्त केले.

पुणे येथील एनसीएलच्या सभागृहात शालेय विद्यार्थी अरजित अमोल मोरे याच्या 'जिज्ञासा: फ्रॉम क्युरिऑसिटी टू क्लॅरिटी' या इंग्रजी पुस्तकाचे प्रकाशन संचालक डॉ. लेले व महावितरणचे संचालक (मानव संसाधन) श्री. राजेंद्र पवार यांच्याहस्ते झाले. यावेळी एनसीएलचे शास्त्रज्ञ डॉ. वाफिया मसीह, डॉ. नरेंद्र कडू, डॉ. एम. कार्तिकेयन, डॉ. महेश धरणे, डॉ. राकेश जोशी, डॉ. राजेश गोन्नाडे, डॉ. शुभांगी उंबरकर तसेच महावितरणचे श्री. अमोल मोरे, डॉ. संतोष पाटणी, श्री. निशिकांत राऊत यांची उपस्थिती होती. या पुस्तकाच्या लेखनासाठी अरजित मोरे याचे महावितरणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. लोकेश चंद्र, मराठवाडा कृषी विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. के. पी. गोरे, स्वामी विवेकानंद हायस्कूलच्या मुख्याध्यापिका प्रणती मित्रा यांनी कौतुक केले आहे.



शालेय विद्यार्थ्यांना प्रयोगशील शिक्षणाची संधी तसेच विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष प्रयोगशाळा अनुभव व प्रयोगशीलतेसाठी मा. पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदी यांनी 'जिज्ञासा- एक दिवस शास्त्रज्ञ म्हणून' हा उपक्रम जाहीर केला आहे. त्यानुसार मुंबई येथील शालेय विद्यार्थी अरजित अमोल मोरे याने सीएसआयआरच्या पुणे येथील राष्ट्रीय रासायनिक प्रयोगशाळेमध्ये एक दिवस वैज्ञानिक म्हणून घालवला होता. या अनुभवावर आधारित त्याने 'जिज्ञासा: फ्रॉम क्युरिऑसिटी टू क्लॅरिटी' या इंग्रजी पुस्तकाचे लेखन केले आहे.

महावितरणचे संचालक श्री. राजेंद्र पवार यांनी सांगितले की, 'अरजित मोरे याचे हे पुस्तक प्रत्येक विद्यार्थ्याने वाचले पाहिजे. विद्यार्थी दशेतील वैज्ञानिक कुतूहल व त्याचे नेमके वास्तव याची मांडणी अरजितने लेखनातून केली आहे. त्यातून शालेय विद्यार्थ्यांना संशोधनासाठी निश्चित प्रेरणा मिळणार आहे'. यावेळी सर्व शास्त्रज्ञ व उपस्थितांनी मनोगतातून अरजितच्या जिज्ञासू वृत्तीचे आणि निरीक्षण क्षमतेचे कौतुक केले.

अरजित मोरे हा जिल्हा इन्स्पायर मानक अवार्ड २०२५ व होमी भाभा बालवैज्ञानिक सुवर्णपदक २०२४ चा मानकरी आहे. त्याचे तीन संशोधन लेख आंतरराष्ट्रीय जर्नलमध्ये प्रसिद्ध झाले असून त्याने इल्यूम्ब्रेला, स्पाईनोगिअर व गटरगार्ड यासारख्या सामाजिक उपयुक्तता असलेले संशोधन विकसित केली आहे.

या पुस्तकातील ११ प्रकरणामध्ये अरजितने डीएनए सिक्वेन्सिंग, सस्टेनेबल केमिस्ट्री, आर्टिफिशियल इंटेलिजन्स, पर्यावरण विज्ञान यांसारख्या विषयांचा अभ्यास कसा केला याचे सोप्या भाषेत वर्णन केले आहे. 'जिज्ञासा' उपक्रमाचा फायदा व शास्त्रज्ञांनी केलेले मार्गदर्शन कसे महत्त्वाचे ठरले याबाबत त्याने मनोगत व्यक्त केले. लवकरच या पुस्तकाचा मराठी अनुवाद प्रकाशित होणार आहे.

# पीएनजी ज्वेलर्सतर्फे 'प्रथा' संग्रह सादर





**लातूर/प्रतिनिधी** :भारतीय विवाहसोहळ्यांच्या हंगामाची सुरुवात होत असताना, भारतातील सर्वात विश्वासार्ह पारंपरिक दागिन्यांच्या ब्रँडपैकी एक असलेल्या पीएनजी ज्वेलर्सने आपला खास असा विवाह संग्रह 'प्रथा' सादर केला आहे. महाराष्ट्र, मध्य प्रदेश, उत्तर प्रदेश आणि गोवा येथे या संग्रहाचा ग्राहकांना अनेक सवलतींसह लाभ घेता येणार आहे.

या नव्या कलेक्शनमध्ये सोने आणि हिरे जडित सुंदर ब्रायडल सेट्स, हार, कानातले, बांगड्या आणि मांगटिका यांचा समावेश आहे. प्रत्येक दागिन्याच्या डिझाईनमध्ये पारंपरिक नक्षीकाम आणि आधुनिक डिझाईन्सचा सुंदर मिलाफ दिसून येणार आहे.

या मोहिमेबद्दल बोलताना, पीएनजी ज्वेलर्सचे अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक डॉ. सौरभ गाडगीळ म्हणाले, प्रथा वेडिंग कलेक्शन म्हणजे वारशाची आणि भावनेची शाश्वत नाळ आहे. या कलेक्शनमधील प्रत्येक डिझाईन वधूच्या नव्या प्रवासाची सखी बनावी, या उद्देशाने तयार केली आहे. या मोहिमेद्वारे आम्ही केवळ दागिने नव्हे, तर प्रत्येक विवाहामागील भावना, बांधिलकी आणि एकतेचा सुंदर उत्सव साजरा करतो. 'प्रथा' कलेक्शनमध्ये भारतीय पारंपरिक कलाकुसरीचा वारसा जाणवतो, नव्या काळासोबत चालत असताना आपली मुळे जपायची आहेत, अशा महिलांसाठी हा संग्रह खास आहे. ठरावीक कालावधीसाठी चालणाऱ्या या मोहिमेचा उद्देश पीएनजी ज्वेलर्सच्या सर्व शोरूम्समध्ये ग्राहकांचे ब्रँडशी असलेलं नातं अधिक दृढ करणे आहे. विवाह हंगामाच्या निमित्ताने पीएनजी ज्वेलर्सतर्फे ग्राहकांसाठी आकर्षक ऑफर्स जाहीर करण्यात आल्या आहेत. सोन्याच्या दागिन्यांच्या मेकिंग चार्जेसवर ३० टक्के पर्यंत सूट आणि हिरे दागिन्यांच्या मेकिंग चार्जेसवर ७५ टक्के पर्यंत सूट. यासोबतच जुन्या सोन्याच्या एक्सचेंजवर ० टक्के कपात, ज्यामुळे प्रेम आणि परंपरेचं प्रतीक असणारे दागिने खरेदी करण्याची ही उत्तम संधी ठरते.

## लातूरमध्ये अनधिकृत होल्डिंगचा सवाल गंभीर NSUI चा पालिकेला अल्टिमेटम

**लातूर/प्रतिनिधी :** लातूर शहरात अनाधिकृतपणे लावण्यात आलेल्या होल्डिंग्स आणि युनिपोलच्या विरोधात लातूर जिल्हा NSUI ने तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. शहर महानगरपालिकेची कोणतीही अधिकृत परवानगी न घेता अनेक ठिकाणी ही जाहिरातफलक उभारण्यात आल्याचा आरोप संघटनेने केला आहे. NSUI पदाधिकाऱ्यांचे म्हणणे आहे की, पालिकेचे नियम धाब्यावर बसवून शहरातील प्रमुख चौक, रस्ते आणि सार्वजनिक ठिकाणी मोठ्या प्रमाणात अनधिकृत होल्डिंग्स झळकत आहेत. या प्रकरणी महानगरपालिकेने कोणतीही कारवाई न केल्याने शहरातील नागरिकांमध्येही नाराजीचे वातावरण पसरले आहे.



संघटनेतर्फे महानगरपालिका प्रशासनाला निवेदन देऊन दुजाभाव न करता तातडीने अनधिकृत फलक हटवण्याची मागणी केली आहे. प्रशासनाने त्वरीत कारवाई न केल्यास लातूर जिल्हा NSUIकडून महानगरपालिका कार्यालयासमोर तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा संघटनेने दिला आहे.

शहर स्वच्छता, नियोजन आणि कायदेपालनाच्या दृष्टीने या प्रकरणी त्वरित पावले उचलावीत, अशी मागणी नागरिकांकडूनही होत असून पुढील काही दिवसांत महानगरपालिकेची भूमिका काय असेल, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. यावेळी जिल्हाध्यक्ष रोहित बिराजदार, शहराध्यक्ष व्यंकटेश झिपरे, युवक काँग्रेस शहर उपाध्यक्ष अक्षय चव्हाण, महेश साळुंके,प्रथमेश राठोड,आनिकेत कवडे, आशज्द शेख व इतर कार्यकर्ते उपस्थित होते.

# दयानंद कला महाविद्यालयात सायबर सुरक्षा शिबिरास उत्स्फूर्त प्रतिसाद

**लातूर/प्रतिनिधी** : दयानंद शिक्षण संस्था संचलित दयानंद कला महाविद्यालय, लातूर येथे प्राचार्य डॉ शिवाजी गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा विधी प्राधिकरण, लातूर तसेच सायबर पोलीस ठाणे, लातूर यांच्या संयुक्त विद्यमाने सायबर सुरक्षा व सायबर गुन्हे प्रतिबंधाबाबत विशेष जनजागृती शिबिर आयोजित करण्यात आले. वाढत्या डिजिटल व्यवहारामुळे सायबर गुन्ह्यात वाढ होत असल्याने विद्यार्थ्यांसह नागरिकांमध्ये जागरूकता निर्माण करण्याच्या उद्देशाने हा उपक्रम उपप्राचार्य डॉ. दिलीप नागरगोजे यांनी आज दि. १९ नोव्हेंबर २०२५ रोजी राबविला. शिबिरात विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.




कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी उपप्राचार्य डॉ. अंजली जोशी होत्या, कार्यक्रमाचे प्रास्ताविक उपप्राचार्य डॉ. दिलीप नागरगोजे यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. संदिपान जगदाळे यांनी प्रभावीपणे पार पाडले.

शिबिराचे प्रमुख मार्गदर्शन मा. श्रीमती बबीता सुधाकर वाकडकर (पोलीस निरीक्षक, सायबर पोलीस ठाणे, लातूर) आणि मा. श्री. व्यंकटेश नागनाथ गिरवलकर (सचिव, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, लातूर) यांनी केले. त्यांनी ऑनलाइन फसवणूक, जढझ व घधउ फसवणुकीचे प्रकार, सोशल मीडिया अकाउंट हॅकिंग, सायबर कायदे, गुन्ह्यांवरील शिक्षा, तसेच डिजिटल सुरक्षिततेसाठी घ्यावयाच्या खबरदारींबाबत विस्तृत माहिती दिली. कोणताही सायबर गुन्हा घडल्यास १९३० या हेल्पलाईनवर त्वरित संपर्क साधण्याचे आवाहन यावेळी करण्यात आले.

विशेष मान्यवर म्हणून डॉ. प्रशांत दिक्षीत (पर्यवेक्षक, दयानंद कला कनिष्ठ महाविद्यालय) आणि मा. श्री. योगेश जगताप (अध्यक्ष, जिल्हा वकील संघ, लातूर) उपस्थित होते. त्यांनी विद्यार्थ्यांना सायबर कायद्यांचे महत्त्व, जबाबदारी आणि डिजिटल माध्यमांचा संयमी वापर याबाबत मार्गदर्शन केले.

अध्यक्षीय समारोपात डॉ. अंजली जोशी यांनी विद्यार्थ्यांनी डिजिटल साक्षरतेसह सायबर शिस्त अंगीकारण्याची गरज अधोरेखित केली. वाढत्या सायबर गुन्ह्यांच्या युगात सजगता, सावधगिरी आणि कायद्यांचे पालन अत्यावश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले.

कार्यक्रमाचा समारोप प्रा. महेश जांगापल्ले यांनी मान्यवरांचे, आयोजकांचे आणि विद्यार्थ्यांचे आभार मानून केला. शिबिरामुळे विद्यार्थ्यांमध्ये सायबर सुरक्षा विषयक जागरूकता लक्षणीयरीत्या वाढल्याचे समाधान व्यक्त करण्यात आले.

# महापरिनिर्वाण दिन २०२५ निमित्त कलबुरगि - मुंबई विशेष

**सोलापूर/प्रतिनिधी** :डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त ६ डिसेंबर २०२५ रोजी मुंबईत अभिवादन करण्यासाठी येणाऱ्या प्रवाशांच्या सोयीसाठी मध्य रेल्वेकडून अनारक्षित विशेष गाड्या चालविण्यात येणार आहेत. त्याचा तपशील पुढीलप्रमाणे:

कलबुरगि - छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस मुंबई अनारक्षित विशेष गाड्या

गाडी क्रमांक ०१२४५ विशेष गाडी कलबुरगि येथून ०५.१२.२०२५ (शुक्रवार) रोजी सायं. ०६:३० वाजता सुटेल आणि पुढील दिवशी सकाळी ०८:२० वाजता छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस मुंबई येथे पोहोचेल.

सोलापुर:-

आगमन - रात्री ०९:४०

प्रस्थान - रात्री १०:२०

गाडी क्रमांक ०१२४६ विशेष गाडी छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस मुंबई येथून



०७.१२.२०२५ (रविवार) रोजी मध्यरात्री १२:२५ वाजता सुटेल आणि त्याच दिवशी सकाळी ११:३० वाजता कलबुरगि येथे पोहोचेल.

सोलापुर:-

आगमन - सकाळी ०८:४५

प्रस्थान - सकाळी ०९:००

थांबे:

गाणगापूर रोड, अक्कलकोट रोड, सोलापूर, कुर्डूवाडी, दौंड, पुणे, लोणावळा, कल्याण आणि दादर.

रचना:

२२ स्लीपर/सामान्य द्वितीय/सेकंड सीटिंग (अनारक्षित)

व २ लगेज-कम-ब्रेक व्हॅन्स (एकूण २४ कोच).


तिकीट बुकिंग:

अनारक्षित तिकिटे स्टेशनवरील बुकिंग काउंटरवर तसेच णढड ॲपवर उपलब्ध आहेत.

प्रवाशांनी वैध तिकिटांसह प्रवास करावा आणि महापरिनिर्वाण दिनानिमित्त चालविण्यात आलेल्या विशेष गाड्यांचा लाभ घ्यावा, असे आवाहन सोलापूर विभागाचे वरिष्ठ विभागीय वाणिज्य व्यवस्थापक (Sr. DCM) श्री. योगेश पाटील यांनी केले आहे.

या विशेष गाड्यांचे वेळापत्रक व थांब्यांची सविस्तर माहिती जाणून घेण्यासाठी www.enquiry.indianrail.gov.in या संकेतस्थळाला भेट द्यावी किंवा NTES ॲप डाउनलोड करावे.

प्रो. जडे यांचे रबरी शिक्के
कॉम्प्युटर नॉयलॉन रबर असलेले
टिकाऊ रबरी शिक्के
तयार करून मिळतील.



शाखा १.
जडे-भारत प्रिंटींग प्रेस, मेनरोड, लातूर
शाखा २.
जडेऑफसेट प्रिंटर्स, मित्र नगर, लातूर
संपर्क: (०२३८२) २४२६०८,२४५४०९

# धाराशिव मध्ये जागतिक विद्यार्थी दिवस मोठ्या उत्साहात साजरा




धाराशिव (प्रतिनिधी)– १७ नोव्हेंबर रोजी आंतरराष्ट्रीय विद्यार्थी दिन साजरा केला जातो. या दिवशी जगभरातील विद्यार्थ्यांच्या हक्क, अधिकार, सुरक्षेसाठी आणि स्वातंत्र्यासाठी त्यांनी केलेल्या संघर्षाची आठवण ठेवली जाते. १७ नोव्हेंबर १९३९ रोजी प्राग (चेकोस्लोवाकिया) मधील विद्यार्थ्यांनी नाझी अत्याचारांविरुद्ध आंदोलन केले होते. या आंदोलनानंतर नाझी सैन्याने नऊ विद्यार्थी नेत्यांची हत्या केली, १,२०० पेक्षा जास्त विद्यार्थ्यांना छळ छावण्यांमध्ये पाठवले, आणि सर्व चेक विद्यापीठे बंद केली. या दुखद घटनेच्या दोन वर्षांनी, १९४१ मध्ये लंडनमध्ये आंतरराष्ट्रीय विद्यार्थ्यांच्या संघटनेने या दिवसाला आंतरराष्ट्रीय विद्यार्थी दिन म्हणून अधिकृत मान्यता दिली. या दिनाचे औचित्य साधून पोदार इंटरनॅशनल स्कूल, धाराशिव मध्ये स्कूलचे प्राचार्य डॉ. वाल्मिक सोमासे सर यांच्या मार्गदर्शनाखाली जागतिक विद्यार्थी दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी स्कूलचे उपप्राचार्य श्री निलेश जाधव सर यांनी विद्यार्थ्यांना सखोल असे मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाचे संपूर्ण नियोजन स्कूलचे इयत्ता सहावी चे वर्गशिक्षक श्री उमर सय्यद सर यांनी केले.

यावेळी मोठ्या संख्येने शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी व पालक वर्ग सहभागी झाला होता.

# विठ्ठल मंदिरात मूर्तीवर तुळशीच्या मंजिरींसह पुष्पवृष्टी

## भक्तांची गर्दी, विठ्ठल मंदिरात भजन, महादेव मंदिरात हरिपाठ



धाराशिव (प्रतिनिधी)– संत ज्ञानेश्वर माऊली महाराज समाधी सोहळ्याला ७२५ वर्षांहून अधिक कालावधी पूर्ण झाल्याबद्दल मंदिरात तुळशीच्या मंजिरींसह पुष्पपृष्टी करण्यात आली. सायंकाळी ६.३० वाजता हरिपाठ व ७ वाजता विश्वनाथ कोकाटे यांच्या हस्ते आरती करण्यात आली. विठ्ठल मंदिरात दर एकादशीला व सोमवारी भजनाचे आयोजन केले जाते. भाजनातून भक्तीचा जागर करण्यात आला.

श्री संत ज्ञानेश्वर माऊली महाराज समाधी सोहळ्यानिमित्त धाराशिव शहरातील बँक कॉलनी येथील विठ्ठल मंदिर, संत ज्ञानेश्वर मंदिर, भवानी चौकातील महादेव मंदिरासह अन्य मंदिरात विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. शहरातील बँक कॉलनीतील विठ्ठल रुक्मिणी मंदिरात पहाटे नित्यपूजन मंदिराचे पूजारी प्रसाद मुसळे व सहायक संतोष महामुनी यांनी केले. त्यानंतर सकाळी ११ वाजता बँक कॉलनीतील रुक्मिणी महिला भजनी मंडळातर्फे ११ ते दुपारी ४ वाजेपर्यंत भजन केले. भजनातून माऊलींचा जयघोष करताना रुक्मिणी महिला भजनी मंडळाच्या अध्यक्षा मंगल डांगे, भाग्यश्री सोमवंशी, सुनंदा धर्म, जयश्री कोकाटे, पेटीवादक किसन पांचाळ, तबलावादक सुभाष राऊत यांच्यासह कॉलनीतील महिला उपस्थित होत्या.

भवानी चौकातील महादेव मंदिरात हरिपाठासह भजन भवानी चौकातील महादेव मंदिरात ज्ञानेश्वर महाराज समाधी सोहळ्यानिमित्त सकाळी ६ ते १० नियमित पूजापाठ, अभिषेक. त्यानंतर १० ते दुपारी १ वाजेपर्यंत माऊलींच्या समाधी सोहळ्यानिमित्त भजनातून पुरुष भक्तांनी माऊलींच्या नावाचा जयघोष केला. यावेळी हभप काटे गुरुजी, दिलीप पाटील महाराज व आत्मलिंग उंबरे, शिवचंद्र वाघमारे, कदम बप्पा, सुभाष माळी यांच्यासह अन्य भजनी मंडळाचे सदस्य उपस्थित होते. सायंकाळी ५ ते ६.३० वाजेपर्यंत हरिपाठ व त्यानंतर ७ वाजता महाआरती करून प्रसाद वाटपाने सांगता झाली.

# तुळजापुरात नगराध्यक्ष पदाचे १४ अर्ज मंजूर

तुळजापूर(प्रतिनिधी)–उमेदवारी अर्जाचा छाननीनंतर नगराध्यक्ष पदासाठी १४ उमेदवार रिंगणात राहिले असून शिवसेना शिंदे गटाचे देवानंद रोचकरी व कॉंग्रेसचे डमी उमेदवार अमोल कुतवळ यांचे उमेदवारी अर्ज एबी फॉर्म अभावी बाद झाले आहेत. नगरसेवक पदाचा २३ जागांसाठी ११७ उमेदवार रिंगणात राहिले आहेत. दरम्यान प्रथेप्रमाणे कोणीच हरकती न घेतल्याने छाननी प्रक्रिया शांततेत आणि वेळेत पार पडली.

नळदुर्ग रोड वरील अभियांत्रिकी महाविद्यालयात उमेदवारी अर्जांची छाननी करण्यात आली. प्रारंभी नगराध्यक्ष पदाचा उमेदवारी अर्जाची छाननी करण्यात आली. यासाठी नगराध्यक्ष पदाचे उमेदवार व त्यांचा प्रतिनिधींना बोलावण्यात आले. नगराध्यक्ष पदाचा उमेदवारी अर्जांचा छाननी नंतर नगर सेवक पदाचा उमेदवारी अर्जांची छाननी करण्यात आली. त्यानंतर एका पाठोपाठ प्रभागातील उमेदवारी अर्जांची छाननी करण्यात आली. यावेळी कोणीच हरकती न घेतल्याने छाननी प्रक्रिया शांततेत आणि वेळत पार पडली. दरम्यान बुधवार (दि. १९) उमेदवारी अर्ज मागे घेता येणार असून, उमेदवारी अर्ज मागे घेण्याच्या अंतिम मुदतीनंतरच निवडणुकीचे चित्र स्पष्ट होणार आहे.

प्रभाग दहामध्ये फक्त सहा उमेदवार या मध्ये मंकावती गल्लीतील प्रभाग क्र. ०४ मध्ये ०२ जागांसाठी सर्वाधिक १८ उमेदवार निवडणुक रिंगणात असून प्रभाग क्र. १० मध्ये ०२ जागांसाठी सर्वात कमी ६ उमेदवार रिंगणात राहिले आहेत. याशिवाय प्रभाग प्रभाग क्र. ७ मध्ये २ जागांसाठी ८ उमेदवारांचे अर्ज मंजूर आहेत.

# व्हंताळ गाव विभागीयलाही अव्वल ठरेल

## विभागीय समितीने पाहणी करून व्यक्त केला विश्वास



उमरगा(प्रतिनिधी)–तालुक्यातील व्हंताळ गावात उपविभागीय समितीने भेट देऊन विविध सोयी–सुविधांची पाहणी केली. या वेळी सर्वत्र स्वच्छता आणि टापटिपपणा पाहून समितीच्या अधिकाऱ्यांनी कौतुक केले. ग्रामपंचायतीला लोकसहभागातून जिल्हास्तरीयला प्रथम क्रमांक पटकावलेले गाव राज्यस्तरीय स्पर्धेत उतरल्यास अव्वल ठरेल, असा सल्ला व विश्वास दिला.

तालुक्यातील व्हंताळ गाव संत गाडगेबाबा स्वच्छता अभियान अंतर्गत धाराशिव जिल्ह्यात प्रथम आले होते. आर, आर आबा स्मार्ट गाव विविध क्षेत्रात राज्यस्तरीय पाच पुरस्कार, टीबी मुक्त गाव आरोग्य विभाग धाराशिव पुरस्कार मिळाले आहेत. सोमवारी (दि. १७) विभागीय समितीच्या पथकाद्वारे व्हंताळ गावाला भेट देऊन पाहणी करण्यात आली. या विभागीय समिती पथकप्रमुख अप्पर आयुक्त विकास विभागीय कार्यालयाच्या सुषमा देसाई, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण कार्यकारी अभियंता नागदे, विभागीय आयुक्त विभाग विस्तार अधिकारी संतोष चप्पलवार, पंचायत समिती गटविकास अधिकारी प्रतापसिंग मरोड यांच्या पथकाद्वारे पाहणी करण्यात आली.

सरपंच, उपसरपंच सर्व ग्रापं सदस्य, कर्मचारी व पंचायत समिती अधिकाऱ्यांचे कौतुक केले. व्हंताळ ग्रामपंचायत अधिकारी प्रशांत भोसले, सरपंच माधव जाधव, उपसरपंच विजय सगर, तंटामुक्त गाव समिती माजी अध्यक्ष दत्तात्रय पाटील, प्रभाकर पाटील यासह नागरिक, ग्रामपंचायत कर्मचारी, अंगणवाडी सेविका आदी उपस्थित होते.

असे नंदनवन असलेले गाव पाहिलेले नाही गावामध्ये सर्वच सुविधा आहेत. सर्वत्र नीटनेटकेपणा दिसतोय. स्वच्छता आहे. गावकरी गुण्यागोविंदाने राहतात. आम्ही असे आनंदी, एकोपा व नंदनवन असलेले गाव कुठेही पहिले नाही, अशी भावनाही समितीतील पदाधिकाऱ्यांनी बोलून दाखवली.

लातूर समाचार धाराशिव
बातम्या,लेख व जाहिराती साठी संपर्क
9422472502
9175325708

# शालेय सहलीसाठी 'एसटीच्या ' नवीन बसेस.. – परिवहन मंत्री प्रताप सरनाईक

मुंबई:(प्रतिनिधी)–' स्वस्त आणि सुरक्षित ' प्रवासाचा आनंद घेण्यासाठी यंदा शाळा – महाविद्यालयांना शालेय सहलीसाठी एसटी महामंडळ नवीन बसेस उपलब्ध करून देणार आहेत, अशी माहिती परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष श्री. प्रताप सरनाईक यांनी दिली.

मंत्री सरनाईक म्हणाले की, दरवर्षी प्रमाणे दिवाळी सुट्टी संपली की, शाळेच्या विद्यार्थ्यांना विविध प्रेक्षणीय स्थळांना भेट देण्यासाठी सहलीचे वेध लागतात. शालेय सहली हा विद्यार्थी जीवनातील अतिशय संस्मरणीय असा अनुभव असतो. राज्य शासन एसटीच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना शालेय सहलीसाठी त्यांच्या एकूण भाड्यामध्ये ५०% टक्के सवलत देते. त्यामुळे अतिशय मापक दरामध्ये विद्यार्थ्यांना महाराष्ट्रातील विविध धार्मिक, ऐतिहासिक पर्यटन स्थळांना भेट देणे शक्य होते. तो त्यांच्या शालेय अभ्यासक्रमातील एक उपक्रम असतो.

अर्थात, यंदा एसटीकडे असलेल्या नवीन बसेस या शालेय सहलीसाठी उपलब्ध करून दिल्या जाणार आहेत. राज्यभरात असलेल्या एसटीच्या २५१ आगारांमधून दररोज ८०० ते १००० बसेस विविध शाळा–महाविद्यालयांना सहलीसाठी उपलब्ध करून दिल्या जातील. अशी माहिती मंत्री सरनाईक यांनी यावेळी केले.

मागील वर्षी शालेय सहलीसाठी १९६२४ बसेस उपलब्ध करून दिल्या.

मागील वर्षी नोव्हेंबर ते फेब्रुवारी दरम्यान राज्यभरातील विविध शाळा–महाविद्यालयांना शालेय सहलीसाठी एसटी महामंडळाने तब्बल १९६२४ बसेस उपलब्ध करून दिल्या होत्या. या माध्यमातून एसटीला तब्बल ९२ कोटी रुपयांचा (प्रतिपुर्ती रक्कमेसह ) महसूल प्राप्त झाला होता.

यंदा देखील प्रत्येक आगारातून त्यांच्या कार्यक्षेत्रातील शाळा– महाविद्यालयांना दररोज एसटी बसेस उपलब्ध करून देण्यात बाबत आवाहन करण्यात येत आहे. आगारप्रमुख, स्थानकप्रमुख स्वतः शाळा –महाविद्यालयाच्या मुख्याध्यापक व प्राचार्यांना भेटून विविध धार्मिक ऐतिहासिक पर्यटन स्थळांच्या सहलीचे आयोजन करण्यासाठी आवाहन करीत आहेत.

# रामकृष्ण परमहंस महाविद्यालयात इंदिरा गांधी यांची जयंती साजरी



धाराशिव (प्रतिनिधी)– येथील रामकृष्ण परमहंस महाविद्यालयात महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.संदीप देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली भारताच्या तिसऱ्या आणि महिला म्हणून पहिल्या पंतप्रधान इंदिरा गांधी यांची जयंती साजरी करण्यात आली.

सर्वप्रथम शिक्षणमहर्षी डॉ.बापूजी साळुंखे आणि संस्थामाता सुशिलादेवी साळुंखे यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून इंदिरा गांधी यांच्या प्रतिमेचे पूजन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.संदीप देशमुख यांच्या शुभहस्ते करण्यात आले.

याप्रसंगी महाविद्यालयातील सर्व गुरुदेव कार्यकर्ते आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सदर कार्यक्रम महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.संदीप देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली संपन्न झाला.

# धाराशिव शहरातील कांही महत्वाचे फोन नंबर

१) रुग्णवाहिका २२३९७६
२) रक्तपेढी २२३९७६
३) जिल्हा रुग्णालय २२६९२७
४) शहरपोलिस स्टेशन२४०९९९
५) अग्नीशामक विभाग २२२१०१
६) रेल्वेस्टेशन २४०९९९
७) एसपी कार्यालय २२७६२०
८) जिल्हाधिकारी का.२२४५०१
९) तहसिल का. २२७८८२
१०) जि.प. २२५४०७
११)नगरपरिषद २२५४०७
१२)जिल्हा माहिती अधिकारी ०२४७२–२२२७४४
१३) जिल्हा उद्योग केंद्र (डीआयसी) ०२४७२–२२२२२६
१४) उस्मानाबाद जिल्ह्याचे उपसंचालक ०२४७२–२२७८ ९ २
१५) उप विभागीय वन कार्यालय, उस्मानाबाद ०२४७२–२२३४०८
१६)अधीक्षक उत्पादन शुल्क कार्यालय ०२४७२–२२३३८७
१७) जिल्हा कल्याण अधिकारी ०२४७२–२२२०१४
१८) प्रादेशिक परिवहन अधिकारी (आरटीओ) ०२४७२–२२२५५५
१९) मुख्य पोस्ट ऑफिस ०२४७२–२२२२१४
२०) जिल्हा रोजगार अधिकारी ०२४७२–२२२२३६
२१) विभागीय नियंत्रक (एमएसआरटीसीसी) ०२४७२–२२२२१६
२२) लातूर समाचार ९४२२४७२५०२
बीडीओ, एम.आर.ए.जी.एस. जिल्हा परिषद ०२४७२–२२०६११
२३)मुख्य कार्यकारी अधिकारी ०२४७२–२२६८४० २४)
२४) अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी ०२४७२–२५) २२३३९७ प्रकल्प संचालक ०२४७१–२२१५५२
२५) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य प्रशासन) ०२४७२–२२३३८८
२६) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्राम पंचायत) ०२४७२–२२३३४३
२७) उप मुख्य कार्यकारी अधिकारी (स्त्री व मुल) ०२४७२–२२२५७०
२८) मुख्य खाते व वित्त अधिकारी ०२४७२–२२२१३२
२९) शिक्षण अधिकारी (प्राथमिक) ०२४७२–२२४१८४

# सहायक धर्मादाय आयुक्त पदासाठी आता वकिलीचा अनुभव अनिवार्य

मुंबई:(प्रतिनिधी)–सहायक धर्मादाय आयुक्त, गट–अ संवर्गातील पदासाठी तीन वर्षे वकिलीचा अनुभव अनिवार्य करण्यासाठी महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था अधिनियम, १९५० मध्ये सुधारणा करण्यास मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते. सर्वोच्च न्यायालयाने एका न्यायालयीन प्रकरणात दिवाणी न्यायाधीश (कनिष्ठ स्तर), प्रथम स्तर न्यायदंडाधिकारी या पदावर अनुभव नसलेल्या विधि पदवीधारकांना केवळ पदवीच्या आधारे (Fresh Law Graduates) नियुक्ती देण्यास अपात्र ठरविले आहे. त्यानुषंगाने सहायक धर्मादाय आयुक्त, गट–अ या अर्धन्यायिक पदावर नामनिर्देशाने नियुक्तीसाठी तीन वर्षे वकिलीचा अनुभव अनिवार्य करण्यासाठी महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था अधिनियमात बदल करण्यास मान्यता देण्यात आली.

सहायक धर्मादाय आयुक्त पदाच्या जबाबदाऱ्या अर्धन्यायिक स्वरुपाच्या आहेत. त्यामुळे केवळ पुस्तकी ज्ञानातून प्रश्न हाताळण्याची गुणवत्ता व संवेदनशीलता प्राप्त होत नाही. त्याकरिता प्रत्यक्ष वकिली करुन पक्षकारांशी संपर्क, न्यायदानाच्या प्रक्रियेत सहभाग आवश्यक आहे. यासाठी अनुभव अनिवार्य करण्याचा निर्णय घेण्यात आला. यामुळे शासनास अनुभवी व चांगल्या दर्जाचे अधिकारी मिळतील, जे न्यायदानाच्या प्रक्रियेसाठी लाभदायक ठरतील. याचा लाभ पक्षकार, विश्वस्त व नागरिकांना होणार आहे.

हे पत्र मुद्रक,प्रकाशक, संपादक व मालक दयानंद शंकरराव जडे, यांनी जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्रनगर, लातूर (महाराष्ट्र) येथे छापून समर्थनगर उस्मानाबाद येथे प्रकाशित केले. मो.नं.९४२२४७२५०२

Latur Samachar Printed & Published by Jade Dayanand Shankar , Printed at Jade Offset Printers,Mitra Nagar Latur. and Published at Samarthnagar,Dharashiv (Osmanabad) Editor : Jade Dayanand Shankar Mob:9422472502 RNI- MAHMAR/2003/11649